RNI 47034/64

# लातूर समाचार
LATUR SAMACHAR
Email-dainiklatursamachar@gmail.com

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)    कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

LATUR लातूर वर्ष ३४ वे अंक १५० वा सोमवार, दिनांक ०१ सप्टेंबर २०२५ (सांज. दैनिक) पोस्ट परवाना नं. L2/RNP/OMD-52/24-26 पृष्ठे – ६ मो:९४२२४७२५०२ किंमत १ रुपया

आमच्याकडे सर्व प्रकारचे कॉम्प्युटर, नायलॉन रबरी शिक्के एका तासात तयार करून मिळतील
संपर्क
जडे ऑफसेट प्रिंटर्स
मित्र नगर, लातूर, फोन : २४२६०८


# मतदार यादीत नावे समाविष्ट करण्याची अंतिम मुदत वाढवली जाणार नाही

## आयोगाने म्हटले– १ सप्टेंबरनंतर आलेल्या हरकतींवरही विचार करू

**पटना/वृत्तसंस्था :** सोमवारी सर्वोच्च न्यायालयाने बिहार मतदार यादी पुनरीक्षण (SIR) प्रकरणाची सुनावणी केली. या प्रकरणात, न्यायालयाने अंतिम मुदत वाढवण्याची मागणी करणाऱ्या याचिका फेटाळून लावल्या.

तथापि, निवडणूक आयोगाने न्यायालयाला आश्वासन दिले की १ सप्टेंबरच्या अंतिम मुदतीनंतरही सादर केलेले दावे आणि आक्षेप विचारात घेतले जातील.

प्रत्यक्षात, बिहारमध्ये प्रारूप मतदार यादीवर दावे आणि आक्षेप दाखल करण्याची अंतिम तारीख १ सप्टेंबर निश्चित करण्यात आली होती. पूर आणि तांत्रिक कारणे उद्धृत करून, याचिकाकर्त्याने १५ सप्टेंबरपर्यंत अर्ज भरण्याची मागणी केली होती. यावर निवडणूक आयोगाने सांगितले की, ३० सप्टेंबरनंतरही अर्ज स्वीकारले जातील.

यानंतर, न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉय मल्ल्या बागची यांच्या खंडपीठाने याचिका फेटाळून लावली.

**न्यायालयात काय घडले?**

याचिकाकर्त्यांच्या वतीने प्रशांत भूषण– अर्ज न करता अनेक मतदारांची नावे मसुदा यादीत समाविष्ट करण्यात आली.



मोठ्या संख्येने लोक स्वतःची नावे काढून टाकण्यासाठी अर्ज करत आहेत. आयोग पारदर्शकतेने त्यांचे नियम पाळत नाही.

निवडणूक आयोगाचे वकील – ७.२४ कोटी मतदारांपैकी ९९.५% मतदारांनी कागदपत्रे सादर केली. आतापर्यंत १.३४ लाखांहून अधिक लोकांनी नाव काढून टाकण्याची विनंती केली आहे, तर नवीन नावे जोडण्यासाठी अर्ज खूपच मर्यादित आहेत.

१ सप्टेंबर नंतरही हरकती आणि दावे सादर करता येतील आणि पात्र लोकांचा समावेश अंतिम मतदार यादीत केला जाईल. जर अंतिम मुदत वाढवली तर संपूर्ण प्रक्रिया अंतहीन होईल.

सर्वोच्च न्यायालयाने म्हटले– इतक्या मोठ्या राज्यात फक्त १२० प्रकरणे, हे आश्चर्यकारक आहे

न्यायमूर्ती सूर्यकांत म्हणाले, 'एवढ्या मोठ्या राज्यात फक्त १२० प्रकरणांमध्येच आक्षेप येत आहेत. हे आश्चर्यकारक आहे. निवडणूक आयोगाने ठरवलेली प्रक्रिया ही मानक आहे आणि ती पाळली पाहिजे. आधार कार्डवर इतका भर का दिला जात आहे? आम्ही पुन्हा पुन्हा एकच आदेश देऊ शकत नाही.'

अंतिम मतदार यादी १ ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध केली जाईल. न्यायालयाने असेही म्हटले आहे की राजकीय पक्षांनी सक्रिय राहावे आणि मतदारांना त्यांचे आक्षेप नोंदवण्यास मदत करावी. ठोस उदाहरणे सादर केल्यास आधार कार्डवरील वादावर ८ सप्टेंबर रोजी पुन्हा सुनावणी होऊ शकते.

**तिसऱ्या सुनावणीत न्यायालयाने ऑनलाइन अर्ज घेण्यास सांगितले होते**

यापूर्वी, सर्वोच्च न्यायालयाने भारतीय निवडणूक आयोगाला (ECI) निर्देश दिले होते की, वगळलेल्या मतदारांना यादीत नावे समाविष्ट करण्यासाठी प्रत्यक्ष अर्ज करण्याव्यतिरिक्त ऑनलाइन अर्ज करण्याची परवानगी द्यावी.

सर्वोच्च न्यायालयाने असेही म्हटले होते की फॉर्म ६ मध्ये दिलेल्या ११ कागदपत्रांपैकी कोणतेही, आधार कार्डसह, सादर केले जाऊ शकते, यामध्ये ड्रायव्हिंग लायसन्स, पासबुक, पाणी बिल यासारख्या कागदपत्रांचा समावेश आहे.

या मुद्द्यावर मौन बाळगल्याबद्दल न्यायालयाने राजकीय पक्षांनाही फटकारले आणि मतदारांना मदत करण्यासाठी तुम्ही काय करत आहात असे विचारले. तुम्ही पुढे यावे.

**सर्वोच्च न्यायालयाने पक्षकारांना विचारले– तुम्ही काय करत आहात?**

सुनावणीदरम्यान न्यायालयाने निवडणूक आयोगाला अनेक प्रश्न विचारले. न्यायमूर्ती सूर्यकांत म्हणाले– राजकीय पक्षांची निष्क्रियता आश्चर्यकारक आहे. राज्यातील १२ राजकीय पक्षांपैकी फक्त ३ पक्ष न्यायालयात आले आहेत. मतदारांना मदत करण्यासाठी तुम्ही काय करत आहात?

राजकीय पक्षांकडे सुमारे १.६ लाख बूथ लेव्हल एजंट असूनही, त्यांच्याकडून फक्त दोनच आक्षेप प्राप्त झाले याबद्दल न्यायालयाने आश्चर्य व्यक्त केले.

# मनोज जरांगे पाटील यांचे शनिवार–रविवारचे आंदोलन विनापरवानगी; सरकारची उच्च न्यायालयात माहिती

**मुंबई/प्रतिनिधी :** मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण मिळावे या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील २९ ऑगस्टपासून मुंबईतील आझाद मैदानावर उपोषणास बसले आहेत. सोमवार त्यांच्या उपोषणाचा चौथा दिवस असून, त्यांना पाठिंबा दर्शविण्यासाठी राज्यभरातून लाखो लोक मुंबईत दाखल झाले आहेत. मनोज जरांगे पाटील यांचे शनिवार–रविवारचे आंदोलन विनापरवानगी; सरकारची उच्च न्यायालयात माहिती दिली. यामुळे मुंबई मोठ्या प्रमाणात विस्कळीत झाल्याचे चित्र आहे. तसेच मुंबईत मोठ्या प्रमाणात वाहतूक विस्कळीत झाली आहे. दरम्यान



जरांगे पाटील यांच्या मागणीवर सरकार कसा तोडगा काढणार हे पाहावे लागणार आहे. यासाठी सरकारकडून विविध प्रकारे प्रयत्न सुरू आहेत. मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला पाठिंबा दर्शविण्यासाठी सर्वच राजकीय पक्षांचे आमदार आणि खासदार आझाद मैदानावर येऊन त्यांची भेट घेत आहेत.

## मराठा आरक्षण आंदोलनाप्रकरणी उच्च न्यायालयात तातडीची सुनावणी

मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे–पाटील यांनी २९ ऑगस्टपासून मुंबईत सुरू केलेल्या आंदोलनाविरोधात केलेल्या जनहित याचिकेवर सोमवारी दुपारी तातडीची सुनावणी होणार आहे. न्यायमूर्ती रवींद्र घुगे यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठापुढे दुपारी दीड वाजता ही तातडीची सुनावणी होणार आहे. मराठा आंदोलनामुळे मुंबईकरांची मोठया प्रमाणात गैरसोय होत असल्याने याचिकेवर तातडीने सुनावणी घेण्याची मागणी याचिककर्त्यांनी केली होती ती न्यायालयाने मान्य केली. तत्पूर्वी, जरांगे यांनी आरक्षणाच्या मागणीसाठी मुंबईत मोर्चा आणण्याचे जाहीर केले आहे. मात्र, जरांगे यांना परवानगीशिवाय हे आंदोलन करता येणार नाही. तसेच, त्यांना परवानगी देण्यात आली तरी, गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मुंबईत मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होण्याची तसेच कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण होऊ नये यासाठी त्यांना मुंबईऐवजी खारघर येथील जागेचा आंदोलनासाठी पर्याय द्यावा, असे आदेश उच्च न्यायालयाने मागील आठवड्यात दिले होते. त्यानंतरही जरांगे यांना आझाद मैदान येथे आंदोलन करण्याची परवानगी देण्यात आली.

## जयक्रांती महाविद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा

**लातूर/प्रतिनिधी :** येथील जयक्रांती कला वरिष्ठ महाविद्यालयात दिनांक २९ ऑगस्ट रोजी मेजर ध्यानचंद यांची जयंती व राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीधर कोल्हे हे होते तर प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक प्रा. शिवराज बाजुळगे, डॉ. सतीश डांगे, उपप्राचार्य रवी नाबदे, प्रा. ऋषिकेश उकिरडे हे होते. मान्यवरांच्या हस्ते मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी बोलताना प्रमुख मार्गदर्शक प्रा. शिवराज बाजुळगे म्हणाले की, मेजर ध्यानचंद यांच्या जीवनात अनेक कठीण प्रसंग आले. अशाही परिस्थितीत त्यांनी त्यावर मात करून देशाला सुवर्णपदक मिळवून दिले. त्यांच्या हॉकीतील कौशल्याची नोंद आंतरराष्ट्रीय स्तरावर घेतली गेली. त्याबाबतचे अनेक उदाहरणे त्यांनी सांगितले. त्यात बली मधील हिटलरचा प्रस्ताव, राणी एलिझाबेथ यांनी छत्रीच्या दांड्याने खेळण्याचे दिलेले आव्हान, मुंबई येथे हॉकीच्या सामन्यात सिनेसृष्टीतील गायक के. एल. सहगल यांना ध्यानचंद यांचे बंधू रूपसिंह यांनी दिलेले गोलच्या तुलनेत गाणी गान्याचे आव्हान असे अनेक प्रसंग सांगून त्यांनी ध्यानचंद यांच्या कार्याचे महत्व अधोरेखित केले.

## युवराज जाधव यांच्या हस्ते बाजार समितीच्या गणेशाची आरती



**लातूर/प्रतिनिधी :** लातूर कृषि उत्पन्न बाजार समिती गणेश मंडळ मार्केट यार्ड,लातूर येथील गणरायाची आरती बाजार समितीचे संचालक युवराज जाधव यांच्या हस्ते करण्यात आली यावेळी बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, संचालक,युवराज जाधव, अनिल पाटील,आनंद पवार, बालाजी वाघमारे, सचिन सुर्यवंशी, शिवाजी कांबळे, सचिव अरविंद पाटील,सहा.सचिव सतिष भोसले, पत्रकार हरिराम कुलकर्णी, विनोद नखाते, बालाजी किसवे,नरेश सुरवसे, गंभीरे,दिनकर लांडगे यांच्यासह बाजार समितीचे अधिकारी कर्मचारी बाजार समितीचे घटक प्रतीनिधी उपस्थित होते

## 'महसूल लोक अदालत'चे १३ सप्टेंबर रोजी आयोजन

**लातूर/प्रतिनिधी :** महसूल विभाग हा महाराष्ट्र शासनाच्या प्रशासनाचा कणा मानला जातो. ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिक आणि शेतकऱ्यांना विविध शासकीय सेवा पुरविणे, जमिनीचे अभिलेख अद्ययावत ठेवणे, सातबारा उतारा सुलभपणे उपलब्ध करून देणे आणि नागरिकांचे प्रलंबित प्रश्न जलदगतीने निकाली काढणे, ही महसूल विभागाची प्राथमिक जबाबदारी आहे. नागरिकांना त्वरित न्याय मिळावा आणि प्रलंबित प्रकरणांचा कमीत कमी वेळेत निपटारा व्हावा, यासाठी महसूल विभाग सातत्याने नाविन्यपूर्ण उपक्रम राबवित आहे. याच अनुषंगाने शनिवार, १३ सप्टेंबर २०२५ रोजी जिल्हा, उपविभाग, तालुका आणि मंडळ स्तरावर महसूल लोक अदालत आयोजित करण्यात येणार आहे.

महसूल न्यायालयांमध्ये प्रलंबित असलेली आणि ज्यामध्ये दोन्ही पक्षकार तडजोडीने वाद मिटविण्यास तयार असतील, अशी प्रकरणे या लोक अदालतीत निकाली काढली जातील. पक्षकार स्वतः किंवा त्यांच्या वकिलांमार्फत उपस्थित राहून तडजोड दाखल करू शकतील. तडजोडीवर आधारित प्रकरणाचा निपटारा झाल्यास त्याविरुद्ध कोणतेही अपील दाखल करता येणार नाही. ही लोक अदालत दिवाणी न्यायालयाच्या धर्तीवर कार्यान्वित केली जाईल.

सर्व तडजोडी कायदेशीर चौकटीत असाव्यात. कायदेशीर तरतुदींना विरोधी तडजोड स्वीकारली जाणार नाही. लोक अदालतीत दाखल झालेली प्रकरणे संबंधित प्राधिकरणामार्फत पुढील सात दिवसांत निकाली काढली जातील.

लोक अदालतीची वेळ आणि ठिकाण

मंडळ स्तरावर संबंधित मंडळ अधिकारी कार्यालय, तालुका स्तरावर संबंधित तहसील कार्यालय, उपविभाग स्तरावर संबंधित उपविभागीय अधिकारी कार्यालय आणि

जिल्हा स्तरावर अपर जिल्हाधिकारी कार्यालय येथे १३ सप्टेंबर रोजी सकाळी ११:०० ते सायंकाळी ४:०० या वेळेत महसूल लोक अदालत आयोजित केली जाईल. संपर्कासाठी संबंधित कार्यालयाचे प्रमुख उपलब्ध असतील.

महसूल लोक अदालतीचा लाभ घेऊन नागरिकांनी आपली प्रलंबित प्रकरणे तडजोडीद्वारे निकाली काढावीत, असे आवाहन अपर जिल्हाधिकारी शिल्पा न. करमरकर यांनी केले आहे.

## कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



पावसामुळे लातूर जिल्ह्यात दीड लाख हेक्टर शेतीचे चे नुकसान...

## चिमटा दयाचा



वृक्षसंवर्धनाचा संदेश दिला तरी आरी कारखाने चालूच दिसतात ! वृक्ष तोडू नका म्हणणे मूर्खपणाचे समजतात !!

## 'केशवराज'मध्ये श्री गणेशाची आरती न्यायाधीश श्री. शिवकुमार डिगे यांच्या हस्ते संपन्न

**लातूर/प्रतिनिधी :** येथील श्री केशवराज माध्यमिक विद्यालयात दि. ३० ऑगस्ट २०२५ शनिवार रोजी आठवी ते दहावी विभागात श्री गणेशाची आरती कोल्हापूर येथे स्थापन केलेल्या उच्च न्यायालयाच्या खंडपीठाचे मुख्य सर्किट बेंचचे न्यायाधीश तथा विद्यालयाचे माजी विद्यार्थी मा.श्री. शिवकुमार डिगे यांच्या हस्ते संपन्न करण्यात आली.




तसेच याप्रसंगी उपस्थित भारतीय शिक्षण प्रसारक संस्था, अंबाजोगाई कार्यकारिणी सदस्य जितेश चापसी, संजय गुरव, स्थानिक समन्वय समिती अध्यक्ष धनंजय तुंगीकर, कार्यवाह शैलेश कुलकर्णी, केशवराज माध्यमिक विद्यालय शालेय समिती अध्यक्ष गंगाधर खेडकर, रेनीसन्स सीबीएसई स्कूलचे शालेय समिती अध्यक्ष मा. श्री मनोज शिरुरे, माजी विद्यार्थी अजय पांडे, धनाजीराव तोडकर, विद्यालयातील पालक संजयकुमार तुरीवाले व सौ. तुरीवाले , बाबासाहेब शेख व सौ. शेख, विद्यालयाच्या पर्यवेक्षिका श्रीमती इंदू ठाकूर, अभ्यासक्रम समितीचे सहप्रमुख श्याम अंदुरे, केशवराज गणेश मंडळाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व सर्व सदस्य विद्यार्थी तसेच आठवी(फ), नववी(फ,ह), दहावी(ई) या वर्गातील विद्यार्थी यांच्या हस्ते श्री गणेशाचे पूजन करण्यात आले.

याप्रसंगी मान्यवरांचा विद्यालयाच्या वतीने केशवराज गणेश मंडळाच्या अध्यक्ष, उपाध्यक्ष, मंडळातील सदस्य विद्यार्थी यांच्या हस्ते यथोचित सत्कार करण्यात आला. याप्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक मा. श्री बालासाहेब केंद्रे, विद्यासभा संयोजक तथा उपमुख्याध्यापक मा. श्री महेश कस्तुरे, पर्यवेक्षक श्रीमती राजश्री कुलकर्णी, श्री धनंजय कुलकर्णी, अभ्यासपूरक मंडळ प्रमुख श्रीमती रेणुका गिरी, गणेशोत्सव प्रमुख श्रीमती वैशाली फुलसे तसेच आठवी ते दहावी विभागातील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती.



ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## दुर्लक्षतेमुळे समस्यात वाढ

राज्यात असो किंवा देशात ज्या समस्याचे भयाण रुप धारण केले जाते त्या बाबीकडे वेळीच दुर्लक्ष केल्यामुळे समस्यात वाढ होत असते. वास्तविक वेळीच लक्ष देवुन त्याचा निपटारा होणे अपेक्षित असते. खाजगी जीवनात असो किंवा व्यवहारीक जीवनात वेळीच काही बाबीकडे लक्ष दिले पाहिजे. आंदोलनाचे स्वरूप बदलत आहे. स्वातंत्र्याच्या व स्वातंत्र्यपुर्ण काळात आंदोलने हे देशासाठी होत होती, त्याच आंदोलनाने स्वातंत्र्याच्यानंतर स्वस्वार्थाची जागा घेतली आहे. देशातील समस्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. त्यामुळे समस्यात वाढ झाली आहे. समस्या ह्या मर्यादित असतात व सोडविण्यासाठी असतात. आपल्या देशात समस्याकाही संपत नाहीत, उलट वाढ होते. इतर देशात व आपल्या भारतात तुलनात्मक विचार केला तर परदेशात रिकामटेकडे सहसा कोणी सापडत नाहीत. प्रत्येकजन आपआपल्या कामात मग्न असतो. मुळात सरकारकडून सर्व सुविधा दिल्या जातात. जन्मल्यापासून ते अंतापर्यंत सर्व सरकार करीत असेल तर पैसा कमावुन ठेवण्याची गरज भासत नाही. भारतात अनेकपिढ्या बसून खाव्यात एवढी व्यवस्था केली जाते. त्यामुळे हाताने असो किंवा जीसीबीने पैसा घरात ओढला जातो. त्यामुळे विचार करणाऱ्याबाबीकडे दुर्लक्ष केले जाते. आलिकडे सतत बोलले जाते, शहरी नक्षलवाद वाढला आहे. मुळात नक्षलवाद कोणत्या कारणामुळे वाढला गेला. याचे उमस्थान व प्रेरणास्थान कोठून आहे याचा विचार केला पाहिजे. जे पेरले तेच उगवण होते, ही बाब सत्य आहे. त्यामुळे आता ओरडून काही उपयोग नाही. मुळात सरकारने काही मुद्दे प्रलंबित ठेवल्याचा सुद्धा परिणाम दिसून येतो. त्यासाठी विचारपुर्वक काही बाबी वेळेच्यावेळी सोडविल्या पाहिजेत. आंदोलने केली पाहिजेत. तो लोकशाहीत हक्क आहे किंवा लोकशाहीने दिलेला अधिकार असे म्हटले जाते, मात्र लोकशाहीत कोणी कोणाचा हक्क हिरावुन घेत असेल तर? याचा विचार केला जात नाही. लोकशाही राष्ट्र, देश जीवंत असेल तरच सर्व बाबी आहेत. जर राष्ट्र, देश परकियांच्या ताब्यात गेल्यास काय होईल? विचार करा, आपला देश पारतंत्र्यात पुन्हा गेला तर काय होईल? लोकशाहीने वागता येईल का? शक्य नाही. पारतंत्र्याची झळ काय असते ते भोगल्यावर कळते. आज स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या बाबत बोलतात, टिका-टिप्पनी करतात. एकदा भारतीय जेलची हवा खाल्लीतर कळते. कारण पारतंत्र्याची जेल किती हालअपेष्टासहन कराव्या लागतात. केवळ स्वातंत्र्यवीरावर टिका करता येते. एखादेवेळी न्यायालयाने साधी शिक्षा सुनवाली तर देश डोक्यावर घेतला जातो. आंदोलने, मोर्चे, निषेध नको ते प्रकार नेत्याच्याप्रेमाखातर केल्या जातात. ही वस्तूस्थिती आहे. त्यामुळे आज देशात बोलणे सोपे आहे मात्र प्रत्यक्षात काही बाबी आवघड आहेत. राष्ट्रीय विचार केला जात नाही. केवळ मागणे सुरू असते. देवासमोर मागितले जाते. आपल्यासरकारसमोर मागीतले जाते. मागणे आपला धर्म आहे. धार्मिकता कोठेही दिसून येते नाही. मानवता दिसून येत नाही. मांसाहार एक दिवस करू नका असे म्हटल्यावर किती राणं पेटले. हिंसा योग्य आहे का? केवळ विचार केला पाहिजे. विचाराचा अभावमुळे आपल्यादेशाचे नुकसान होत आहे. जेवढे सरकारकडून घेता येईल तेवढे घ्यावे. त्या बदल्यात देणे दूरच राहीले जाते. किती घेणार किंवा घेतल्यास किती देशासाठी परतफेड केली जाते याचा विचार कोणीही करीत नाही. याला जबाबदार कोण? असा विचार समोर येतो. आज हे द्या, ते द्या दिलेली समाधानी नाहीत, ज्यानादेणे बाकी आहेत. मागणे चालू आहेत तेही समाधानी नाहीत. यामागे मुख्य कारण भारतीय शिक्षण पद्धती आहे. काय चांगले किंवा काय वाईट हे शिकविले जात नाही. केवळ मागणे चालूच आहे. मग शहरी असो किंवा ग्रामीण भागातील नक्षलवाद कमी होणार का? मुळात अशा बाबी का वाढतात याचा विचार केला जात नाही. अविचारीपना वाढला आहे. तो एक स्वभाव बनला आहे. देशात आज पर्यंत स्वातंत्र्यानंतर केवळ धनसंचय करणे हा एकमेव उद्देश ठेवुन वाटचाल केली जाते. मग देशाची प्रगती कशी शक्य होणार? आज अमेरिका भारतावर दबाब टाकत आहे. कारण काय तर भारत रशियाकडून तेल खरेदी केली जात आहे. हेच अमेरिकेच्या डोळ्यात खुपत आहे. दबाब टाकत आहे. मात्र भारताचे पंतप्रधान यांनी लवचिक भुमिका स्किवारली नाही उलट ताठर भुमिका घेतली आहे. याचा भारतीयांना सार्थ अभिमान वाटणे स्वाभाविक आहे. भारताला स्वातंत्र्य मिळविण्यासाठी अनेक स्वातंत्र्यवीरांची केलेल्या बलिदानाची आठवण विसरत चाललो आहोत त्यामुळे आंदोलन देशासाठी होत नाहीत. ही बाब नजरेआड करून चालणार नाही. न्याय देणारे काय करीत आहेत हे वाचल्यावर वाईट वाटते. आपल्या पुर्वजांनी कशासाठी प्राणाची आहुती दिली. मुळात देशाला स्वराज्य मिळाल्यापासून पाया जो राष्ट्रीय विचाराचा असावयास पाहिजे तो दिसून येत नाही. देशाची प्रथम सुत्रे योग्य व्यक्तीच्या हाती गेली असते तर आज भारत महासत्ताधिश बनला असता. ठराविकांच्या हाती धन संपत्ती आहे. आज जी बोटावर मोजण्याइतकींचे नावे विरोधक घेत आहेत त्यांची संपत्ती व साम्राज्याचा एकदा आंदोलनकर्त्यांनी अभ्यास केला पाहिजे. आज कशासाठी मागणी करतात. नोकऱ्या किंवा राजकारणात येण्यासाठी! दुसऱ्या देशात एक बाब बिंबविली जाते धनसंचयाची गरज नाही. सर्व मोफत जवळपास दिले जाते. आरोग्य व शिक्षण जर मोफत दिले पैसा लागतोच कशाला? अन्नधान्य मोफत वाटले जात आहे. ज्या बाबीला पैसा लागतो त्यासाठी धनसंचय हा भ्रष्टाचारातून केला जातो ही बाब दुर्लक्षित करता येत नाही. त्यामुळे यापुढे तरी सुधारणा केली पाहिजे. आज अमाप पैसा हा जनतेच्या कर रुपाने जमविला जातो. कोणी नेता, पुढारी, सत्ताधारी किंवा विरोधक दानधर्म करीत नाहीत. घेण्यासाठी असणारी मंडळींच जर फुस लावत असेल तर ते योग्य नाही. त्यामुळे कोणतीही बाब मग आंदोलने असो किंवा अन्य बाबी असोत त्या विचारपुर्वक असल्या पाहिजेत. नसता आपण एक ना एक दिवस भस्म होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# सोनार समाजाने संत नरहरी महाराज आर्थिक विकास महामंडळाच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा-वसंत पोतदार

सोनार समाजातील व्यक्ती, कुटुंब, आणि समाजाच्या आर्थिक उन्नतीसाठी स्वयं रोजगाराला चालना देण्याच्या उद्देश्याने श्री. संत नरहरी महाराज आर्थिक विकास महामंडळाची स्थापना शासनाने केली. महामंडळाचे कामकाजाला आता सुरुवात झाल्याचे समजल्यामुळे मी वसंत पोतदार अध्यक्ष व खजिनदार गजानन सोनार सोनार समाज संस्था सोलापूर आम्ही दोघांनी महामंडळाच्या जिल्हा व्यवस्थापक श्रीमती वृषाली लहारे यांची आज भेट घेतली. त्यांनी सखोल, सविस्तर माहिती दिली. सोनार समाज बांधवासाठी महामंडळ कर्ज योजनेची माहिती खालील प्रमाणे देत आहे. सोनार समाजाच्या विकासासाठी खालील विविध योजनांचा समावेश केलेला आहे.

**२० % बीज भांडवल योजना** --ही योजना राष्ट्रीयकृत बँका व डी. सी. सी. बँकेच्या माध्यमातून राबविण्यात येते. महामंडळाचा सहभाग २० %, लाभार्थी सहभाग ५ %, बँक सहभाग ७५ % असतो. प्रकल्प मर्यादा रुपये ५ लाख इतका आहे. व्याज दर ६% असून परतफेड कालावधी ५ वर्षे आहे. अर्जदाराचे वय १८ ते ५० वर्षे आणि कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रू. एक लाख पर्यंत.

रू. एक लाख पर्यंत थेट कर्ज योजना -- अर्जदाराचे वय १८ ते ५५. सिबिल क्रेडिट स्कोअर किमान ५०० इतका असावा. कौटुंबिक वार्षिक उत्पन्न ग्रामीण व शहरी भागासाठी रू एक लाख. लाभार्थी सहभाग कांही नाही. नियमित समान ४८ मासिक हप्त्यामध्ये मुद्दल रू. २,०८५ / - परत फेड करणाऱ्या लाभार्थ्याला व्याज भरावे लागणार नाही. तथापी थकीत हप्त्यावर द. सा. द. शे. ४ % व्याजदर आकारण्यात येईल. वैयक्तिक कर्ज व्याज परतावा रू. पंधरा लाख पर्यंतची कर्ज योजना -- ओ. बी. सी. प्रवर्गातील गरजू, कुशल व्यक्तीला कृषी संलग्न व पारंपारिक उपक्रम, लघु उद्योग, मध्यम उद्योग, उत्पादन, व्यापार व विक्री, सेवा क्षेत्र ई. व्यवसाया करिता कर्ज व्याज परतावा उपलब्ध करून देणे. महामंडळाच्या पोर्टलवर नांव नोंदणी व अर्ज सादर करणे अनिवार्य आहे. बँके मार्फत लाभार्थींना रू. पंधरा लाख पर्यंत कर्ज वितरित केले जाईल. कर्ज हप्ते नियमित भरल्यास व्याजाची रक्कम १२ % च्या मर्यादेत व्याज परतावा रक्कम अनुदान स्वरूपात लाभार्थीच्या आधार लिंक बँक खात्यात जमा करण्यात येईल. लाभार्थ्याने ऑनलाईन पोर्टलवर उद्योग सुरु असल्याचे किमान दोन फोटो अप लोड करावेत. अर्जदाराचे वय १८ ते ५० वर्षे असावे. वार्षिक उत्पन्न मर्यादा आठ लाख पर्यंत.

**गट कर्ज व्याज परतावा योजना** – महामंडळाच्या निकषानुसार विहित केलेल्या वार्षिक उत्पन्न मर्यादेतील उमेदवाराचे बचत गट, भागीदारी संस्था, सहकारी संस्था, कंपनी अधिनियम २०१३ अंतर्गत एल एल पी, एफ पी ओ अशा शासन प्रमाणिकरण प्राप्त संस्थांना बँके तर्फे स्वयं रोजगार, उद्योग उभारणी करिता जे कर्ज दिले जाईल, त्या कर्ज रकमेवरील व्याज परतावा बँक प्रमाणिकरणा नुसार महामंडळाकडून अदा केला जाईल. गटाने वेळेत कर्जाचे हप्ते भरल्यास जास्तीतजास्त १२ % व्याज दाराच्या आणि रू. पंधरा लाख मर्यादेत एकूण व्याजाची रक्कम त्यांच्या आधार लिंक बँक खात्यात दरमहा महामंडळामार्फत जमा करण्यात येईल. इतर कोणतेही चार्जेस, फीस महामंडळ अदा करणार नाही. गटातील लाभार्थ्यांचे कर्ज खाते आधार लिंक असणे अनिवार्य आहे. गटातील लाभार्थ्यांचे वय १८ ते ४५ वर्षे असावे. गटातील उमेदवाराने अर्ज करते वेळी या प्रकल्पा साठी व यापूर्वी महामंडळाच्या अथवा इतर महामंडळाच्या कोणत्याही योजनांचा वैयक्तिक लाभ घेतलेला नसावा. गटाच्या भागीदाराचे किमान रू ५०० कोटीच्या वर ठेवी असलेल्या व कोअर बँकिंग सिस्टीम असलेल्या राष्ट्रीयकृत / शेड्युल्ड बँकेत खाते असावे. गटातील सर्व सदस्यांचा सिबिल क्रेडिट स्कोअर किमान ५०० इतका असावा. गटातील उमेदवारांनी महामंडळाच्या अधिकृत वेब पोर्टलवर अर्ज सादर करणे बंधनकारक आहे.

**अर्जदार लाभार्थीची अर्हता --**

अर्जदार ओ बी सी आणि महाराष्ट्र रहिवासी असावा. तो कोणत्याही बँक, महामंडळ,वित्तीय संस्थेचा थकबाकीदार नसावा. बीज भांडवल योजना व थेट कर्ज योजनेकरिता शहरी, ग्रामीण अर्जदाराचे वार्षिक उत्पन्न एक लाख रू. पेक्षा कमी असावे. कुटुंबातील एका व्यक्तीस एकाच योजनेचा लाभ घेता येईल. अर्जदाराने निवडलेल्या व्यवसायाचे त्याला ज्ञान, अनुभव असावा.

**अर्जासोबत जोडावयाची कागद पत्रे–** उत्पन्नाचा दाखला, नॉन क्रिमिलेअर प्रमाण पत्राच्या साक्षान्कीत प्रती, जातींचे प्रमाण पत्र, शिधापत्रिका प्रमाणित प्रत, आधार कार्ड, पासपोर्ट साईझ फोटो, व्यवसाय स्थळाची भाडे पावती, करारनामा, ७ / १२ उतारा, शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र, जन्म तारखेचा दाखला, दोन जामीनदाराचे हमी पत्र अथवा गहाण खत, स्थानिक स्वराज्य संस्थेचे ना हरकत प्रमाणपत्र, तसेंच ज्या प्रयोजनेसाठी कर्ज मंजूर होणार आहे त्यासाठीच त्याचा उपयोग करण्याबाबतचे अर्जदाराचे प्रतिज्ञापत्र, तांत्रिक व्यवसायाकरिता आवश्यक असतील असे परवाने / लायसन्स, व्यवसायाचा प्रकल्प अहवाल व लागणारा कच्चा माल, यंत्र सामुग्री ई. चे दरपत्रक, महामंडळाच्या संचालक मंडळाने निर्देशीत केल्यानुसार इतर कागदपत्रे, अर्जदाराने अर्जासोबत मूळ प्रमाणपत्र न जोडता त्याच्या साक्षान्कीत प्रती जोडावेत.

**शैक्षणिक कर्ज व्याज परतावा योजना–** उच्च शिक्षणासाठी राज्य, देशांतर्गत, अंतर राष्ट्रीय अभ्यास क्रमासाठी प्रवेश घेण्यासाठी इतर मागास प्रवर्गातील विध्यार्थी, विध्यार्थिनींना बँके मार्फत उपलब्ध होणाऱ्या शैक्षणिक कर्ज रकमेवरील व्याजाचा परतावा करणे. उच्च शिक्षणासाठी बँके कडून राज्य व देशांतर्गत रू. १० लाख, परदेशी अभ्यास क्रमासाठी रू. २० लाख इतके महतम कर्ज अदा करण्यात येईल. विध्यार्थ्यांचे वय १७ ते ३० वर्षे असावे व तो ईमाव प्रवर्गातील महाराष्ट्राचा रहिवाशी असावा. अर्जदाराची ग्रामीण व शहरी भागाकरिता कौटुंबिक वार्षिक उत्पन्न मर्यादा शासनाच्या सक्षम प्राधिकरणाने वेळोवेळी निर्धारित केलेल्या नॉन क्रिमिलेअर मर्यादित असावी. अर्जदार ई. १२ वी ६० % गुणांसह उत्तीर्ण असावा.

**राज्य व देशांतर्गत अभ्यासक्रम** – आरोग्य विज्ञान, अभियांत्रिकी, व्यावसायिक व व्यवस्थापन अभ्यासक्रम, कृषी, अन्न प्रक्रिया व पशु विज्ञान. राज्य व देशांतर्गत अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विध्यार्थ्याकरिता बँकेने उपलब्ध करून दिलेल्या कर्जामध्ये शैक्षणिक शुल्क, पुस्तके, साहित्य खरेदी व अर्जदाराच्या राहण्याचा व भोजनाचा खर्च याचा समावेश राहील. परदेशी अभ्यासक्रम - आरोग्य विज्ञान, अभियांत्रिकी, व्यावसायिक व व्यवस्थापन, विज्ञान, कला, यामध्ये प्रवेश घेतलेल्याना बँकेने उपलब्ध करून दिलेल्या कर्जा मध्ये फक्त शैक्षणिक शुल्क, पुस्तके, साहित्य खरेदीचा समावेश राहील. कौशल्य विकास प्रशिक्षण योजना --समाजातील परंपरागत व्यवसायाचे आधुनिकीकरण झालेले असल्यामुळे त्या परंपरागत व्यवसायात कार्यरत असलेल्या तसेच इतर शैक्षणिक पात्रता धारण केलेल्या ओ बी सी पात्र व्यक्तींना आधुनिक प्रशिक्षणा चा लाभ व्हावा तसेच कौशल्य विकास प्रशिक्षण प्रदान करून त्यांना कौशल्यपूर्ण बनविणे व त्याद्वारे रोजगार किंवा स्वयं रोजगार उपलब्ध करून देणे. वयोमर्यादा १८ ते ५० वर्षे. शिक्षण ई. १० वी. महामंडळाच्या / च्या वेब पोर्टलवर उमेदवाराने नोंदणी करणे अनिवार्य आहे. जात प्रमाणपत्र, उत्पन्नाचे आठ लाख रू. पर्यंतचे प्रमाणपत्र. वय, रहिवाशी दाखला, आधार कार्ड अप लोड करावे लागेल. स्किल इंडिया पोर्टल वर नोंदणी केलेल्या प्रशिक्षण संस्थेमार्फत प्रशिक्षण देण्यात येईल. संपूर्ण प्रशिक्षण हे महामंडळामार्फत देण्यात येईल.


**महिला स्वयं सिद्धी व्याज परतावा योजना** – समाजातील गरीब, होतकरू, परित्यक्ता महिलांचे सक्षमीकरण करून त्यांना स्वावलंबी व आत्मनिर्भर करणे, महिला बचत गटातील किंवा ओबीसी प्रवर्गातील महिलांनी उत्पादीत केलेल्या वस्तूंचे उत्पादन प्रक्रिया, मूल्य आधारित उद्योगाकरिता बँकेमार्फत मंजूर करण्यात आलेल्या रू. ५ ते १० लाख पर्यंतच्या कर्ज रकमेवरील १२ % व्याजाच्या मर्यादेत व्याज परतावा उपलब्ध करून देण्यात येईल. सदर योजना महिला आर्थिक विकास महामंडळाच्या लोक संचालित साधन केंद्रच्या साहाय्याने राबविण्यात येणार आहे. व्याज परतावा योजनेचा लाभ महामंडळा कडून घेता येईल. ओबीसी ५०% महिलांचा समावेश असलेल्या पात्र महिला बचत गटास रू. ५ लाखापर्यंत कर्ज बँकेकडून उपलब्ध करून घेण्यास मान्यता देण्यात येईल. प्रथम टप्प्यातील कर्ज नियमित परत फेडीनंतर सदर बचत गट द्वितीय टप्प्यात रू. १० लाख पर्यंत कर्ज बँकेकडून मंजूर करून घेण्यास पात्र होईल. द्वारे बँकेने मंजूर केलेल्या आणि नियमित कर्ज परत फेड केलेल्या बचत गटास १२ % पर्यंतच्या व्याज मर्यादेत व्याज परतावा बँकेच्या प्रामाणिकरणानुसार मिळेल. महिला बचत गटातील महिला ओबीसी व महाराष्ट्र रहिवाशी असावी. वय वर्षे १८ ते ६० असावे.

**महामंडळाच्या योजनातर्गत सुरु करता येण्यासारखे व्यवसाय.--** कुक्कुट पालन, दुग्ध व्यवसाय, मत्स्य व्यवसाय, कृषी क्लिनिक, ऑल्यूमिनियम फॅब्रिक शॉप, ऑटो स्पेअर पार्टस, पुस्तकं दुकान, फळं, भाजीपाला विक्री दुकान, जनरल स्टोअर्स, हार्ड वेअर व पेंट शॉप, लाकडी वस्तू बनविणे, वीट भट्टी, टेलरिंग युनिट, वास्तू विशारद व्यवसाय, ग्लास व फोटोफ्रेम सेंटर, कापडं दुकान, दवाखाना, अभियांत्रिकी सल्ला केंद्र, हॉटेल व्यवसाय, औषधं दुकान ई. तसेच या शिवाय इतर कोणतेही कायदेशीर व्यवसाय.तरी पात्र सोनार बांधवानी संत नरहरी महाराज आर्थिक विकास महामंडळाच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा.

सोलापूर येथे महामंडळाचे कामकाज सुरु झाले आहे त्याचप्रमाणे महामंडळाचे कामकाज राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात सुरु झाले आहे. सोनार हा पारंपारिक सोन्या चांदीचे दागिने करणारा कारागीर आहे. या कारागीरांची स्थिती सध्या फार वाईट आहे. या कारागीरा कडे भांडवल नसल्याने तो स्वतःचा व्यवसाय करू शकत नाही .सोने व चांदीचे भाव वाढल्याने त्यातील गुंतवणूक देखील वाढली आहे. त्यामुळे भांडवल दारांच्या हातात हा व्यवसाय आहे. त्यांच्याकडुन कारागिराना पुरेशी मजुरी मिळत नाही. व्यवसायासाठी भांडवल नाही. मजुरी अपुरी या कोंडीत सापडलेल्या सोनार समाजाला आता न्याय मिळण्याची अपेक्षा वाटते.

तरी सोलापूर जिल्ह्यातील ईच्छुक सोनार कारागीर बांधव, भगिनींनी अधिक माहितीसाठी सोलापूर जिल्हा व्यवस्थापक श्रीमती वृषाली लहारे मॅडम व निरीक्षक श्री शिवशंभो साहेब , द्वारा महाराष्ट्र राज्य इतर मागास वर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ३ रा मजला, सात रस्ता सोलापूर यांना थेट जाऊन कार्यालयीन वेळेत भेट घेऊन तुमच्या प्रकल्प बाबत अधिक माहिती घेऊन लाभ घ्यावा. राज्यातील ईतर जिल्यातील बांधवानी त्यांच्या जिल्हा व्यवस्थापक यांचेसी संपर्क साधून लाभ घ्यावा ही विनंती.

**वसंत पोतदार**



अध्यक्ष,सोनार समाज संस्था ( महाराष्ट्र राज्य ), सोलापूर जिल्हा सोलापूर मोबाईल ९४२३० ६५९१५

# गुणवत्तापूर्ण शिक्षणव्यवस्था लोकाभिमुख करण्यावर भर !

शिक्षण हे समाजाच्या सर्वांगीण विकासाचे आणि राष्ट्राच्या प्रगतीचे मूळ आहे. शिक्षणामुळे केवळ ज्ञानसंपादन होत नाही तर आत्मविश्वास, व्यक्तिमत्त्व विकास, सामाजिक जबाबदारी आणि आर्थिक स्वावलंबनाची वाट खुली होते. म्हणूनच शासनाने ''शिक्षण सर्वांसाठी'' हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून प्रत्येक घटकातील विद्यार्थ्यांना समान संधी देण्यासाठी राज्य शासनाने विविध योजना आणि सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. शिक्षण हे केवळ ज्ञानप्राप्तीचे साधन नसून समाजपरिवर्तनाचे शक्तिशाली साधन आहे. आजच्या युगात शिक्षण व्यवस्थेला विद्यार्थ्यांच्या गरजा, स्वप्ने आणि क्षमतांशी जोडणे ही काळाची गरज आहे. या जाणिवेतून शासनाने शिक्षण व्यवस्था लोकाभिमुख करण्यासाठी अनेक ठोस पावले उचलली आहेत. विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे यासाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला, संशोधन वृत्तीला आणि कौशल्यविकासाला चालना देणारे उपक्रम राबवले जात आहेत.



**अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशांकरिता एसईबीसी व ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्यास मुदतवाढ**

राज्य शासनाने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताचा विचार करून अनेक महत्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. राज्यात २६ फेब्रुवारी २०२४ पासून सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागासवर्ग () आरक्षणाची अंमलबजावणी सुरू करण्यात आली. या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशासाठी तसेच शासकीय सेवांमधील सरळसेवेसाठी १० टक्के आरक्षण देण्यात आले आहे. यानंतर मा. न्या. शिंदे समितीच्या शिफारशीनुसार मराठा समाजातील काही विद्यार्थ्यांना कुणबी, कुणबी-मराठा किंवा मराठा-कुणबी जातीचे म्हणजेच इतर मागास वर्ग प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र मिळाले आहे. मात्र या विद्यार्थ्यांपैकी अनेकांना जातवैधता प्रमाणपत्र तातडीने न मिळाल्याने प्रवेश प्रक्रियेत अडचणी येत होत्या. या पार्श्वभूमीवर राज्यशासनाने अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षातील प्रवेशांकरिता एसईबीसी व ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सुरुवातीला सहा महिने, त्यानंतर तीन महिन्यांची मुदतवाढ दिली होती. तरी देखील काही विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र मिळवण्यास अडचणी येत आल्याचे निदर्शनास आले आणि अनेक विद्यार्थ्यांनी तक्रारी केल्या होत्या याची राज्य शासनाने दखल घेऊन पुन्हा तीन महिन्यांची अतिरिक्त मुदतवाढ दिली आहे.

याशिवाय, सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशांसाठी सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागासवर्ग () व ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सहा महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली आहे. यामुळे विद्यार्थ्यांचे प्रवेश जातवैधता प्रमाणपत्रांच्या अभावी त्यांचे प्रवेश रद्द होणार नाहीत आणि शैक्षणिक नुकसान टळणार आहे.

**तंत्रशिक्षणातील प्रवेशांची आकडेवारी (२०२४-२५)**

सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागासवर्ग आरक्षणाच्या अंमलबजावणीनंतर राज्यातील तंत्रशिक्षण संस्थांमध्ये मराठा विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणावर प्रवेश घेतले आहेत.

**तंत्रशिक्षणातील प्रवेशांची आकडेवारी (२०२४-२५)**

पदवी : १७ हजार ७७८, पदव्युत्तर : १ हजार ९२७, डिप्लोमा : ७ हजार ३५४ म्हणजेच एकूण २७ हजार ०५९ विद्यार्थी यांनी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये आरक्षणाअंतर्गत प्रवेश घेतलेला आहे.

**डॉ. पंजाबराव देशमुख सारथी देशांतर्गत उच्च शिक्षण शिष्यवृत्ती योजना**

राज्यातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा प्रवर्गातील जे गुणवंत विद्यार्थी पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी मान्यता प्राप्त २०० शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेतील अशा पात्र ३०० विद्यार्थ्यांना प्रतीवर्षी देशांतर्गत शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते. ही योजना छत्रपती शाहू महाराज व मानव विकास संस्था (सारथी), पुणे या शासनाच्या संस्थेमार्फत ''डॉ. पंजाबराव देशमुख सारथी देशांतर्गत उच्च शिक्षण शिष्यवृत्ती योजना'' या नावाने शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून राबविण्यात येत आहे. यामध्ये मराठा, कुणबी, मराठा-कुणबी, कुणबी-मराठा आणि कुणबी-जातीच्या विद्यार्थ्यांसाठी राज्य शासनाने सुरु केलेली डॉ. पंजाबराव देशमुख सारथी देशांतर्गत उच्च शिक्षण शिष्यवृत्ती योजना ही विद्यार्थ्यांसाठी आशेचा किरण ठरत आहे. सन २०२२-२३ पासून या योजनेद्वारे विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी आर्थिक पाठबळ मिळू लागले असून, उच्च शिक्षणाचे प्रमाण वाढत असून शिक्षणाचा दर्जा वाढविण्यास मदत होत आहे.

या योजनेअंतर्गत राज्यातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी, कुणबी-मराठा व कुणबी जातीतील आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांना देशांतर्गत उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती दिली जाते. विद्यार्थ्यांना केवळ शुल्क सहाय्यच नव्हे, तर वसतिगृह, पुस्तके, अभ्यास साहित्य, प्रवास भत्ता आदी विविध सुविधा पुरवल्या जातात.यामुळे मराठा, कुणबी, मराठा-कुणबी, कुणबी-मराठा व कुणबी जातीतील गरीब व हुशार विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्यास प्रोत्साहन.आणि आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक जगात उभे करण्यासाठी शैक्षणिक मदत होऊन उच्च व तांत्रिक शिक्षण घेताना होणारा आर्थिक खर्चही कमी होतो त्यामुळे उच्च शिक्षणात विद्यार्थांचे प्रमाण वाढते.

**छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती**

मराठा, कुणबी, कुणबी-मराठा, मराठा-कुणबी लक्षित गटातील पीएच.डी. करणाऱ्या गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्तीच्या माध्यमातून विशेष प्रोत्साहन देण्याकरिता सन २०१९ या वर्षापासून छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती () सुरु करण्यात आली आहे. सदर छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती अंतर्गत लक्षित गटातील ३०७८ विद्यार्थ्यांना सारथी संस्थेद्वारे सन २०२३ पर्यंत अधिछात्रवृत्ती मंजूर करण्यात आली आहे.आज रोजी पर्यंत ३९३ विद्यार्थ्यांची पुर्ण झाली असून ११० विद्यार्थ्यांना विविध ठिकाणी नोकरी लागली आहे. या विद्यार्थ्यांपैकी २३ विद्यार्थ्यांना त्यांच्या संशोधन विषयात पेटंट मिळाला आहे.

**विद्यार्थ्यांना देण्यात येणारी विद्यापीठ अनुदान आयोगाप्रमाणे अधिछात्रवृत्ती**

प्रमाणे (प्रथम ०२ वर्ष) एकूण प्रती वर्ष रक्कम अधिछात्रवृत्ती निकषा नुसार ५ लाख ५३ हजार ३००, एकूण प्रती माह अधिछात्रवृत्ती ४६ हजार १०८ आहे.

तसेच प्रमाणे (२ वर्षानंतर पुढील ०३ वर्ष) एकूण प्रती वर्ष रक्कम अधिछात्रवृत्ती ६ लाख २९ हजार ८००, एकूण प्रती माह अधिछात्रवृत्ती ५२ हजार ४८३ देण्यात येते. अधिछात्रवृत्ती अंतर्गत अंतिमरित्या निवड झालेल्या उमेदवारांना आर्थिक सहाय्य हे सारथीकडून ज्या रोजी अवार्ड लेटर दिले जाईल, त्या तारखेपासून पुढे पीएच.डी. करिता पाच वर्ष किंवा उमेदवार संशोधनासाठी विद्यापीठ महाविद्यालय/संस्था येथे रुजू झालेला असेल. (विद्यापीठ/महाविद्यालय/संस्थेच्या अहवालातील नमूद रुजू तारीख), या वेळी जी नंतरची तारीख असेल त्या तारखेपासून उमेदवाराच्या फक्त उर्वरित कालावधीसाठी पीएच.डी. च्या फक्त उर्वरित कालावधीसाठी एकुण ५ वर्षांच्या कालावधीच्या आधारे किंवा उमेदवारांनी ज्या तारखेस संशोधन अहवाल () सादर केला असेल, यापैकी जी अगोदरची तारीख असेल त्या तारखेपर्यंत अनुज्ञेय राहील. निवड झालेल्या लाभार्थ्यांना रक्कमे संदर्भात विद्यापीठ अनुदान आयोगाप्रमाणे अंतर्गत होणाऱ्या बदलानुसार अधिछात्रवृत्ती अनुज्ञेय राहील.

अधिछात्रवृत्ती योजनेअंतर्गत सन २०१९ मध्ये पात्र विद्यार्थी ५०३, पीएचडी घेतलेले विद्यार्थी २४६, नोकरी लागलेले विद्यार्थी ७४ आहेत. सन २०२० मध्ये पात्र विद्यार्थी २०४, पीएचडी घेतलेले विद्यार्थी ८०, नोकरी लागलेले विद्यार्थी १८ आहेत. सन २०२१ मध्ये पात्र विद्यार्थी ५५१, पीएचडी घेतलेले विद्यार्थी ६४, नोकरी लागलेले विद्यार्थी १० आहेत. सन २०२२ मध्ये पात्र विद्यार्थी ८५१, पीएचडी घेतलेले विद्यार्थी ४, नोकरी लागलेली विद्यार्थी १ आहेत. सन २०२३ मध्ये पात्र विद्यार्थी ९६९ आहेत.

**परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती**

राज्यातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा या जातीच्या विद्यार्थ्यांना आर्थिक परिस्थितीमुळे उच्च शिक्षणासाठी परदेशातील नामांकित विद्यापीठामध्ये प्रवेश घेता येत नाही. विद्यार्थ्यांची गुणवत्ता असून आर्थिक परिस्थितीमुळे उच्च शिक्षणापासून वंचित रहावे लागते. मराठा, कुणबी, कुणबी-मराठा, मराठा-कुणबी जातीतील मुलामुलींना परदेशातील नामांकित विद्यापीठांमध्ये अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यासाठी परदेशी शिष्यवृत्ती योजना लागू करण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्यातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा प्रवर्गातील जे गुणवंत विद्यार्थी पदव्युत्तर पदवी/पदविका व पीएचडी अभ्यासक्रमासाठी मध्ये २०० च्या आत रॅन्कींग असलेल्या शैक्षणिक संस्था/विद्यापीठामध्ये गुणवत्तेनुसार प्रवेश घेतील अशा मराठा, कुणबी, मराठा-कुणबी व

>> पान ५

# वृद्धाश्रम...




सुमती पाटील वय वर्षे सत्तर. वृद्धाश्रमातल्या नोंदवहीत नाव लिहिलं गेलं आणि भरल्या घरात राहणाऱ्या सुमतीबाई अचानक वृद्धाश्रमात राहायला आल्या. भल्या मोठ्या दोन बॅगा त्यांच्याजवळ होत्या. विशेष म्हणजे त्या एकट्याच आल्या होत्या. घरातलं एकही माणूस त्यांच्यासोबत नाही हे पाहून वृद्धाश्रमातली मंडळी चकितच झाली. बाईंचं घरातल्या मंडळींबरोबर खूपच बिनसलंय हे साऱ्यांच्याच लक्षात आलं.


सुमतीबाई सत्तरीच्या होत्या. तरी तब्येतीने तशा ठणठणीतच होत्या. गोऱ्या गोमट्या सुमतीबाईंनी छान चष्मा लावला होता. डोक्यावरच्या केसांनी चंदेरी शाल पांघरलेली होती. गोड आवाजात बोलणाऱ्या सुमतीबाईंना बघताच सगळी मंडळी कुतूहलाने त्यांच्याकडे पाहू लागली. बाईंनी त्यांना हसून अभिवादन केले. साऱ्याजणी कुजबुजू लागल्या. चांगल्या घरातल्या दिसतायत, तरी पण वृद्धाश्रमात! का? घरात सुनेबरोबर पटत नाही वाटतं! पण बघा, घर सुटले तरी बाईंच्या चेहऱ्यावर दुःखाचा जराही लवलेश नाही. कुणीतरी कुजबुजले.

सुमतीबाई एका आठवड्यातच वृद्धाश्रमात छानपैकी रुजल्या. तिथल्या लोकांशी गप्पा मारू लागल्या. त्यांच्याशी खेळ खेळू लागल्या. सुमतीबाईंचा आवाज छान होता. त्यामुळे रोज गाण्यांच्या मैफली भरू लागल्या. त्यांना वाचनाचेही प्रचंड वेड होते. त्यामुळे सोबत आणलेल्या पुस्तकांबरोबरच वृद्धाश्रमात असलेल्या छोट्याशा ग्रंथालयाचा त्या वापर करायच्या. रोज बाहेर फिरायला जायचं, शेतामध्ये काम करायचं, बरोबरच्या स्त्री-पुरुषांशी गप्पा मारायच्या, त्यांची सुख-दुःख जाणून घ्यायची. वृद्धाश्रमातल्या स्वयंसेवकांनाही त्या मदत करायच्या. सुमतीबाई नेहमीच उत्साही आणि आनंदी असायच्या. त्यामुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व सगळ्यांना हवेहवसे वाटू लागले. याउलट बाकीची मंडळी नेहमीच निरुत्साही! घरातल्या आठवणीने रडायची, मुला-सुनांच्या नावाने खडे फोडायची. या असल्या जीवनाबद्दल खंत व्यक्त करायची; परंतु सुमतीबाई मात्र दिवसभर अत्यंत उत्साही असायच्या. रात्री देवाचं नामस्मरण करत झोपी जायच्या. पण त्यांच्या खोलीतील दिवे सगळे झोपले तरीसुद्धा चालूच असायचे. सगळ्यांना कुतूहल वाटायचं सुमतीबाई रात्री लवकर झोपत का नाहीत. रात्री बारानंतरच त्यांच्या खोलीतला दिवा बंद व्हायचा आणि पुन्हा सकाळी सगळ्यांच्या आधी ५ वाजता उठून त्या तयार असायच्या. थोड्याच दिवसांत सुमतीबाई वृद्धाश्रमात सगळ्यांच्या आवडत्या, अगदी गळ्यातल्या ताईत बनल्या. हा हा म्हणता वर्ष संपून गेलं आणि अचानक एक दिवस त्यांची नात, सुनबाई आणि मुलगा स्वतःची गाडी घेऊन त्यांना परत न्यायला आले. हे कसे काय विपरीत घडले! कारण वृद्धाश्रमातून असे पुन्हा परत आपल्या घरी कोणी गेले नव्हते. त्यामुळे सगळ्यांनाच मोठे आश्चर्य वाटले.

पण आज आपल्या आवडत्या सुमतीबाई जाणार म्हणून सारेच दुःखी झाले. त्यांच्यामुळे वृद्धाश्रमात एक प्रकारचे चैतन्य आले होते. पण आता त्या जाणार या कल्पनेनेच काही जणी त्यांच्या गळ्यात पडून रडत होत्या. आता सगळे जण हॉलमध्ये जमले. आज वृद्धाश्रमाची संचालक मंडळीदेखील हजर होती. सगळे जण सुमतीबाईंबद्दल भरभरून बोलले. मग सुमतीबाई बोलायला उभ्या राहिल्या आणि जे काही सांगू लागल्या ते ऐकून सगळ्यांनाच आश्चर्याचा धक्का बसला. त्या म्हणाल्या, माझ्या मित्रांनो आणि मैत्रिणींनो वृद्धाश्रमातलं एक वर्ष कसं भरभर निघून गेलं. खरंतर सुरुवातीला तुमच्या नजरेत मला दिसत होतं, की या बाई वृद्धाश्रमात कशा आल्या. त्यांचं घरात मुला-सुनांबरोबर पटत नाही का! परंतु तसं काही नव्हतं. खरंतर मला वृद्धाश्रमातले जीवन, तिथल्या लोकांच्या समस्या या विषयावर अभ्यास करून एक प्रबंध लिहायचा आहे. एक पुस्तक लिहायचं आहे आणि म्हणून तो अनुभव घेण्यासाठी मी या ठिकाणी एक वर्ष राहिले. माझ्या वागण्यातून, बोलण्यातून वृद्धाश्रम जरी असला तरी आपण आपले जीवन आनंदाने कसे जगावे याची थोडीशी तरी कल्पना तुम्हाला नक्कीच आली असेल. आपण सगळ्यांनी मला जे प्रेम, सहकार्य दिलेत त्याबद्दल मी आपल्या सर्वांची ऋणी आहे आणि बाई थांबल्या. तोच वृद्धाश्रमातल्या एक बाई बोलू लागल्या. खरंच सुमतीबाई तुम्ही या वयात लेखन करता? वाचन करता! अरे हो म्हणूनच तुमच्या खोलीतला दिवा रात्री १२ वाजल्याशिवाय कधी बंद होत नव्हता. खरंच माणसानं आनंदी कसं जगावं, आपला वेळ कसा घालवावा. आपल्या आवडीच्या गोष्टी कशा कराव्यात आणि त्यातून स्वतः आनंद घेत इतरांना आनंद कसा द्यावा याचं एक आदर्श उदाहरण तुम्ही आम्हाला घालून दिलं आहे. आपण शिकवलेल्या नवीन नवीन गोष्टी आम्ही सातत्याने अमलात आणू आणि नेहमीच आनंदी राहण्याचा प्रयत्न करू. स्वतःला कामात, आपल्या छंदात रममाण करून घेऊ. आपल्या नव्या पुस्तकाची आम्हीदेखील वाट पाहू. धन्यवाद, ग्रेट सुमतीबाई... मग सगळ्यांनी टाळ्यांच्या कडकडाटात, भरल्या डोळ्यांनी सुमतीबाईंना निरोप दिला.

**-कथा : रमेश तांबे**

# वायू प्रदूषण ४० टक्क्यांनी कमी केल्यास आयुर्मानात वाढ शक्य



भारताने २०२६ पर्यंत वायू प्रदूषण ४० टक्क्यांनी कमी करण्याचे सुधारित लक्ष्य साध्य केल्यास 'राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रमा'अंतर्गत (एनसीएपी) १३० शहरांमधील रहिवाशांच्या आयुर्मानात २०१७च्या तुलनेत दोन वर्षांची वाढ होऊ शकते, असे 'एनर्जी पॉलिसी इन्स्टिट्यूट'ने (ईपीआयसी) दिलेल्या एका नवीन अहवालात म्हटले आहे.

भारताने २०१९मध्ये 'एनसीएपी' सुरू केला होता. यात २०१७च्या पातळीच्या तुलनेत २०२४ पर्यंत वायू प्रदू-षणाची पातळी २० ते ३० टक्क्यांनी कमी करण्याचे लक्ष्य होते. त्यामध्ये बदल करून २०२६पर्यंत १३० शहरांमध्ये ४० टक्के कपात करण्याचे नवे लक्ष्य ठेवण्यात आले. हे लक्ष्य साध्य झाल्यास १३० शहरांमधील रहिवाशांचे आयुर्मान २०१७ च्या तुलनेत दोन वर्षांनी वाढेल, असे शिकागो विद्यापीठाच्या 'एनर्जी पॉलिसी इन्स्टिट्यूट'च्या (ईपीआयसी) २०२५च्या अहवालात नमूद करण्यात आले आहे.

सरकारच्या आकडेवारीनुसार, २०१७-१८च्या तुलनेत २०२४-२५मध्ये १३०पैकी १०३ शहरांमध्ये गुणवत्ता पीएम-१०च्या पातळीत सुधारणा झाली. त्यापैकी ६४ शहरांनी ही पातळी २० टक्क्यांहून कमी केली, तर २५ शहरांनी ४० टक्क्यांहून अधिक घट साध्य केली.

काय आहे अहवालात?

भारतातील १.४ अब्ज नागरिकअशा भागात राहतात जिथे सरासरी वायू प्रदूषण जागतिक आरोग्य संघटनेच्या मार्गदर्शक तत्त्वांपेक्षा जास्त आहे.

हवेची गुणवत्ता जर जागतिक मानकांनुसार असेल, तर सर्वात स्वच्छ भागात राहणाऱ्या नागरिकांही आयुर्मान ९.४ महिन्यांनी वाढू शकते.

हवेची गुणवत्ता पातळी २०२३ मध्ये २०२२ च्या तुलनेत पीएम २.५ ने जास्त होती. ही पातळी जागतिक आरोग्य संघटनेच्या मार्गदर्शक तत्त्वांपेक्षा आठपट जास्त होती.

जागतिक मानकांनुसार हे प्रमाण आणल्यास भारतीयांचे सरासरी आयुर्मान साडेतीन वर्षे वाढणे शक्य आहे.

# राहुल यांची मतदार हक्क यात्रा



मतदार हक्क यात्रेत काँग्रेसच्या स्थानिक नेत्याने मोदी यांना शिवीगाळ केल्याचा आरोप भाजपकडून होत आहे. गृहमंत्री अमित शहा यांनी त्याबद्दल राहुल यांनी मोदी यांची आणि देशाची माफी मागावी, अशी मागणी केली आहे. यावरुन भाजप आणि काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये हाणामारी होण्यापर्यंत मजल गेली आहे.

बिहारमध्ये या वर्षाखेरीस होणार्या विधानसभेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी सुरू केलेली मतदार हक्क यात्रा लक्षवेधी ठरत आहे. या यात्रेच्या निमित्ताने राहुल गांधी भाजपचा खरा चेहरा जनतेसमोर उघड करू पाहात आहेत. गेल्या वर्षी झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीवर राहुल यांनी त्या आधी काढलेल्या भारत जोडो यात्रेचा फारसा प्रभाव दिसून आला नव्हता, आता मतदार हक्क यात्रेच्या निमित्ताने ते बिहारमध्ये आपल्या पक्षाचा पाया अधिक घट्ट करू पाहात आहेत. १९९०च्या दशकात बिहारमध्ये काँग्रेसचा जो दबदबा होता तो आता राहिलेला नाही. काँग्रेसला मिळालेल्या मतांचा टक्का १० टक्क्यांपेक्षाही खाली घसरलेला आहे. २०१० च्या विधानसभेच्या निवडणुकीत काँग्रेसला केवळ ४ जागा मिळाल्या होत्या, तर मताची टक्केवारी केवळ ८.३७ टक्के होती. २०१५ मध्ये काँग्रेसने विधानसभेच्या ४१ जागा लढवल्या; पण केवळ २७ जागांवर काँग्रेसला विजय मिळाला होता; पण मतांची टक्केवारी ६.६६ टक्क्यापर्यंत खाली आली होती. २०२० मधील विधानसभा निवडणुकीत मतांची टक्केवारी ९.४८ टक्क्यापर्यंत वाढली; पण ७० जागा लढवूनही काँग्रेसला केवळ १९ जागा राखता आल्या. आता राहुल गांधींनी मतदान याद्यांतून ६५ लाखांवर मतदारांची नावे वगळण्यात आल्याचा मुद्दा घेऊन निवडणूक आयोग आणि भारतीय जनता पक्षावर टीकेचा रोख वळवला आहे. त्यांच्या या यात्रेमुळे कार्यकर्त्यांमध्ये जल्लोषाचे वातावरण पसरले आहे; मात्र कार्यकर्त्यांचा हा उत्साह निवडणुकीत विजयाच्या स्वरूपात पाहायला मिळेल का याविषयी साशंकता आहे.

कार्यकर्त्यांमध्ये उत्साह

राहुल आणि तेजस्वी यादव यांच्या या मतदार हक्क यात्रेने भाजपसमोर काही प्रमाणात आव्हान निर्माण केले आहे. या यात्रेमुळे काँग्रेसचे नेतृत्व थेट ग्रामीण आणि शहरी जनतेशी जोडले जात आहे. बिहारसारख्या मोठ्या राज्यात थेट संवाद महत्त्वपूर्ण ठरू शकतो. बिहारमध्ये कमजोर झालेल्या काँग्रेसला या यात्रेच्या माध्यमातून कार्यकर्त्यांना एकत्र आणण्याची संधी मिळत आहे. या यात्रेला राष्ट्रीय पातळीवर चर्चेत ठेवण्यामुळे काँग्रेसचे बिहारमधील अस्तित्व जाणवू शकते. या यात्रेतून राहुल गांधी भाजपच्या धोरणावर थेट प्रहार करतानाच बेरोजगारी, महागाई आणि सामाजिक न्याय या मुद्द्यांचीही दखल घेत आहेत. त्यातून अल्पसंख्याक आणि युवक वर्ग काँग्रेस-राजदकडे वळू शकतो. बिहारमध्ये संघटनात्मक पातळीवर काँग्रेस कमजोर आहे, स्थानिक नेतृत्वही कमकुवत आहे. त्यामुळे लगेचच तेथे मतांतरे घडतील आणि काँग्रेस प्रभावी कामगिरी करील अशी शक्यता सध्या तरी नाही.

त्यामुळेच राजदच्या साथीने काँग्रेस आपला पाया अधिक भक्कम करण्याच्या प्रयत्नात आहे. त्यासाठी मतदार हक्क यात्रा उपयोगी ठरू शकते. ही यात्रा कार्यकर्त्यांना ऊर्जा देईल; पण प्रत्यक्षात मोठे यश मिळवण्यासाठी काँग्रेसला स्थानिक नेतृत्व घडवावे लागेल. प्रादेशिक पक्षाबरोबर योग्य युती करावी लागेल. या यात्रेतून राहुल गांधी यांना बिहारमधील बेरोजगारी, स्थलांतर, पायाभूत सुविधा, कायदा सुव्यवस्था यांसारख्या स्थानिक प्रश्नांना भिडावे लागेल. केंद्रीय प्रश्न आणि निवडणूक आयोगासारख्या स्वायत्त यंत्रणे-वरील आरोपातून काँग्रेसच्या हाती फारसे काही लागणार नाही. राहुल गांधींची ही यात्रा तेजस्वी यादव यांच्या साथीने सुरू असली आणि गेल्या निवडणुकीत राजदने चांगली कामगिरी केली असूनही राहुल यांनी पुढचा मुख्यमंत्री कोण असणार, ही नावे गुलदस्त्यात ठेवली आहे, किंबहुना तेजस्वी यांच्या नावाला मान्यता दिलेली नाही. कदाचित निवडणुकीच्या आधी या युतीत होणार्या संभाव्य जागा वाटपात आपली भूमिका केंद्रस्थानी असावी, अशी त्यामागे अटकळ असावी.

## डॉक्टर टीप्स

### बुद्धी तल्लख होण्यासाठी आपल्या आहारात करा हे पदार्थ



ज्स्ट्रॉबेरी, करवंदे, रास्पबेरी या सारख्या फळांमध्ये फायटोकेमिकल्स मुबलक मात्रेमध्ये असतात. ही बुद्धीवर्धक असून, स्मरणशक्ती तल्लख ठेवणारी आहेत. ब्रोकोलीमध्ये असणारे सल्फोराफेन हे तत्व मेंदूची शिथिलता दूर करण्यास सहायक आहे. यामध्ये असलेले फोलिक ॲसिड मेंदू सक्रीय राहण्यास मदत करणारे असून, त्यामुळे अल्झायमर्स सारख्या व्याधींचा धोका पुष्कळ अंशी कमी होतो.भोपळ्याच्या बियांमध्ये झिंक मुबलक मात्रेमध्ये असून, हा क्षार बुद्धीवर्धक आणि स्मरणशक्ती तल्लख करणारा आहे. त्याशिवाय यामध्ये असणारे मॅग्नेशियम, ब जीवनसत्वे, ही देखील मेंदूच्या आरोग्यास पूरक आहेत.बीटामध्ये मुबलक प्रमाणात असलेल्या नायट्रेटस मुळे मेंदूला होणारा रक्तप्रवाह चांगला राहतो. त्यामुळे बीटाचे सेवनही बुद्धीवर्धक मानले गेले आहे. **(क्रमशः)**

## विनोद

**दिग्दर्शक साहेबांनी पुढील प्रसंग 'जेल' चा असल्याचे सांगितले आहे!!**




'काय गुंडोबा, तुम्ही आज चिंतातूर दिसता?'

'अहो, काय सांगू तुम्हाला पांडोबा, आमची ही बिस्किटांचा पुडा आणायला बाहेर गेली ती दोन-तीन दिवस झाले परतच आली नाही.'

'तर मग एवढी चिंता करायचं काय कारण आहे? तुम्ही दुसरा पुडा का आणत नाही?'

## संदेश

Arj kiya hai....Jara gaur
Farmayega !!
Kabhi tum gaur se dekho
aaina
Kabhi tum gaur se dekho
aaina
....tum bhi ho Made in China

## सुविचार



जे तुम्ही पुस्तकात पाहू शकता ते कधीही स्मरणात ठेवण्याचा प्रयत्न करू नका.


**-अल्बर्ट आइनस्टाइन**

**संस्कृत सुभाषित**

**'बीज तेचि फळ येईल शेवटी।**
**लाभ हानी तुटी ज्याची तया ॥**

**अर्थ** - जे पेराल तेच उगवते आणि लाभ व हानी ही ज्याची त्याची वेगवेगळी असते म्हणून सत्कर्म करा, सद्विचाराने चाला.

# मनोरंजक महाशब्दकोडे



## आडवे शब्द

१. कातीव दगड
३. नेहमी पटकन विसरणारा
६. वाडवडील
१०. आरडाओरडा, दंगा
१२. दोस्त
१३. व्याह्यांची बायको
१४. अयोध्येची नदी
१६. दाट, निबीड
१८. पृथ्वी
२०. उत्साह
२१. हे खाऊन रूप येते का?
२३. किडा
२५. वाईट सवय
२७. अस्थी
२९. अंत:करण
३१. पराक्रमी पुरुष
३२. आदरणीय
३३. दरवाजा
३५. कापड इ.चा पृष्ठभाग
३६. तृण
३८. आच, उष्णता
३९. घर
४०. मातीच्या भांड्याचा तुकडा
४१. वरणाची दाळ
४२. निर्दय
४३. उद्यान
४४. जवळीक, मैत्री
४७. स्वीकृत, अंगीकृत
५०. अप्रिय, न आवडणारा
५१. सुळका
५१अ. अफवा, वदंता
५२. बालीश
५४. भगिनी
५५. पुष्कळ
५७. तंग
५८. क्रीडा
५९. वेखंड
६०. कुरडईच्या जोडीने तळला जाणारा पदार्थ
६१. बाण
६३. बंध
६४. विलंब
६५. टिंगल
६६. कायद्याला या हजार असतात!
६९. चकित नजर
७१. लाह्यांचा होम
७४. बासरी
७५. चुलता
७७. उणे
७८. न टाळण्याजोगे
७९. बरोबरीचा
८०. शर्विलक
८१. झेप
८३. घोडा
८४. पुष्पगुच्छ
८५. खेळातील चाल
८६. आईचा भाऊ
८७. गगन
८८. रहायला घर नसलेला

## उभे शब्द

१. दिवा (हिंदी)
२. वेडावाकडा
४. यज्ञातील सरपण
५. निशा
६. अस्तनी
७. नातवंडाचा मुलगा
८. राष्ट्र
९. वारा
१०. डिंक
११. ताजे, तरतरीत
१३. स्वच्छ, निर्मळ
१५. रूधिर
१७. फांदी
१९. सेपे
२२. डोंगर
२४. मसाल्याच्या पदार्थातील एक
२६. धीर, बळ, उत्साह
२८. व्याकूळ, व्याकूळ करणारे
२९. बंदुकीची गोळी
३०. विश्व
३४. गंध, परिमळ
३५. एक 'बोलका' पक्षी
३७. रंग
३८. अटकसत्र
३९. कोडगा
४०. संसद सदस्य
४३. वक्रता
४५. मीठ
४६. वार्धक्य
४८. भेग
४८अ. उगाळलेल्या औषधाचा ओढा
४९. आगेकूच
५०. '... म्हणते रे गीत, परि सारे हलक्याने, आड येते रीत'
५२. पोळ्या करण्याचे साधन
५३. मिठी
५४. नोकर
५७. गृह
६१. लाज
६२. परिचय
६५. सूत कातण्याचे साधन
६७. आक्रोश
६८. हट्ट
७०. घट्ट दह्याची वडी
७२. अग्नी
७३. रगेल, माजखोर
७६. चोळीचा एक प्रकार
८१. पार्वती
८२. एक अप्सरा
८३. सध्या संकटात सापडलेला वन्य प्राणी

## आडवे उत्तर

१.चिरा ३.विसराळू ६.बापजादे १०.गोंगाट १२.मित्र १३.विहीण १४.शरयू १६.गडद १८.वसुधा २०.जोम २१.तूप २३.कीटक २५.लत २७.हाड २९.काळीज ३१.वीर ३२.वंद्य ३३.कवाड ३५.पोत ३६.गवत ३८.धग ३९.निवास ४०.खापर ४१.तूर ४२.क्रूर ४३.बाग ४४.घसट ४७.पतकरलेले ५०.नावडता ५१.कडा ५१अ.गप ५२.पोरकट ५४.बहीण ५५.रगड ५७.घट्ट ५८.खेळ ५९.वचा ६०.पापडी ६१.शर ६३.पाश ६४.उशीर ६५.टर ६६.पळ-वाट ६९.टकमक ७१.लाजाहोम ७४.वेणू ७५.काका ७७.वजा ७८.अटळ ७९.तुल्य ८०.चोर ८१.उडी ८३.वारू ८४.झेला ८५.खेळी ८६.मामा ८७.आभाळ ८८.बेघर

## उभे उत्तर

१.चिराग २.डोंगा ४.समिधा ५.रात्र ६.बाही ७.पणतू ८.देश ९.वायू १०.गोंद ११.टवटवीत १३.विमल १५.रक्त १७.डहाळी १९.सुकर २२.पहाड २४.लवंग २६.तकवा २८.कातर २९.काडतूस ३०.जग ३४.वास ३५.पोपट ३७.वर्ण ३८.धरपकड ३९.निगरगट्ट ४०.खासदार ४३.बाक ४५.लवण ४६.म्हातारपण ४८.तडा ४८अ.लेप ४९.वाटचाल ५०.नाही कशी म्हणू तुला ५२.पोळपाट लाटणे ५३.कव ५६.गडी ५७.घर ६१.शरम ६२.ओळख ६५.टकळी ६७.टाहो ६८.हेका ७०.कवडी ७२.जाळ ७३.मगरूर ७६.काचोळी ८१.उमा ८२.रंभा ८३.वाघ




# क्रीडा विश्व

## थोडक्यात/ संक्षिप्त

### निवृत्त क्रिकेटपटूंना बीसीसीआय कडून किती पेन्शन मिळते?

दिल्ली-भारतीय क्रिकेट चाहते २०२५ हे वर्ष कधीच विसरू शकणार नाहीत. याच वर्षात ४ दिग्गज भारतीय खेळाडूंनी क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली. ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर असताना आर अश्विनने कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली होती. त्यानंतर विराट आणि रोहितने इंग्लंड दौऱ्याआधी कसोटी क्रिकेटला रामराम केलं. अलीकडेच चेतेश्वर पुजारानेही आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली आहे. दरम्यान खेळाडूंनी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केल्यानंतर त्यांना बीसीसीआयकडून किती पेन्शन मिळते? जाणून घ्या.निवृत्त होणाऱ्या खेळाडूंसाठी बीसीसीआयकडून किती पेन्शन मिळते?

बीसीसीआयने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्त होणाऱ्या खेळाडूंसाठी पेन्शन योजना सुरू केली आहे. ही पेन्शन योजना आंतरराष्ट्रीय खेळाडूंसाठी आणि प्रथम श्रेणी क्रिकेट खेळणाऱ्या खेळाडूंसाठी तयार करण्यात आली आहे. मुख्य बाब म्हणजे, खेळाडूचं वय वाढल्यानंतर त्यांच्या पेन्शनच्या रकमेतही वाढ होते. वयाची ६० वर्ष ओलांडल्यानंतर पेन्शनमध्येही वाढ होते.

खेळाडूंना किती पेन्शन मिळते?

माध्यमातील वृत्तानुसार, बीसीसीयकडून कसोटी क्रिकेट खेळणाऱ्या खेळाडूंना आधी ३७,५०० रुपये इतकी पेन्शन दिली जायची. आता या पेन्शनमध्ये वाढ करण्यात आली आहे. आता कसोटी क्रिकेट खेळणाऱ्या खेळाडूंना ६०,००० रुपये पेन्शन दिली जाते. तर प्रथम श्रेणी क्रिकेट खेळणाऱ्या खेळाडूंची पेन्शन १५,००० हून ३०,००० रूपये पेन्शन दिली जाते. आधी वरिष्ठ खेळाडूंना ५०,००० रुपये इतकी पेन्शन दिली जायची. आता ही रक्कम वाढवण्यात आली आहे. आता वरिष्ठ खेळाडूंना ७०,००० रुपये पेन्शन दिली जाते.

बीसीसीआयकडून दिली जाणारी पेन्शनची रक्कम ही दरवर्षी वाढवली जात नाही. बीसीसीआयकडून खेळाडूंचा विचार केला जातो. वाढती महागाई आणि खेळाडूंवर येणाऱ्या आर्थिक समस्यांचा विचार करता पेंशनच्या रकमेतही वाढ केली जाते. ज्या खेळाडूंनी आंतरराष्ट्रीय स्तरावर भारतीय संघाचं प्रतिनिधित्व केलं आहे किंवा देशातंर्गत क्रिकेटमध्ये दमदार कामगिरी केली आहे अशा खेळाडूंना बीसीसीआयकडून पेन्शन दिली जाते. या योजनेत महिला क्रिकेटपटू आणि काही पंचांचा देखील समावेश आहे.

***

### महेंद्रसिंग धोनी पुन्हा टीम इंडियाचा 'मेंटॉर'? बीसीसीआयने दिली ऑफर!



नवी दिल्ली-भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) आगामी टी-२० विश्वचषक २०२६ साठी टीम इंडियाच्या मेंटरपदाची जबाबदारी पुन्हा एकदा महेंद्रसिंग धोनीकडे सोपवण्याचा विचार करत असल्याचं वृत्त समोर आलं आहे. नुकत्याच समोर आलेल्या काही मीडिया रिपोर्ट्सनुसार, बीसीसीआयने धोनीला या भूमिकेसाठी प्रस्ताव दिला आहे.

भारताने २०१३ पासून कोणताही आयसीसी ट्रॉफी जिंकलेली नाही. अशा परिस्थितीत, बीसीसीआयला धोनीच्या शांत आणि संयमी नेतृत्वाचा फायदा पुन्हा एकदा संघाला मिळावा अशी अपेक्षा आहे. धोनीने २०११ च्या एकदिवसीय विश्वचषकात आणि २०१३ च्या चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये भारतीय संघाला विजय मिळवून दिला होता. त्याचा हा अनुभव संघातील खेळाडूंसाठी मोलाचा ठरू शकतो. विशेषत: कठीण परिस्थितीत निर्णय घेण्याची त्याची क्षमता संघासाठी उपयुक्त ठरेल.

यापूर्वी, टी-२० विश्वचषक २०२१ मध्ये धोनीने टीम इंडियाचा मेंटर म्हणून काम पाहिले होते. त्यावेळी संघाचे मुख्य प्रशिक्षक रवी शास्त्री होते. त्यामुळे आता २०२६ च्या विश्वचषकासाठी धोनीने हा प्रस्ताव स्वीकारल्यास, तो मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीरसोबत काम करेल अशी शक्यता आहे.

पुढील पाऊल-सध्या ही बातमी केवळ मीडिया रिपोर्ट्सवर आधारित आहे आणि बीसीसीआय किंवा धोनीकडून यावर कोणतीही अधिकृत घोषणा झालेली नाही. मात्र, धोनीने हा प्रस्ताव स्वीकारल्यास, भारताच्या टी-२० विश्वचषकाच्या तयारीला निश्चितच मोठी गती मिळेल.

## आशिया चषक २०२५ मधील सामन्यांच्या वेळेत मोठे बदल




युएई : आशिया कप २०२५ स्पर्धा ९ सप्टेंबरपासून युएईमध्ये सुरू होत आहे. अबू धाबीचे शेख झायेद स्टेडियम आणि दुबई आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियम आशिया कपचे आयोजन करण्यासाठी सज्ज आहेत. या स्पर्धेसाठी सर्व संघांची घोषणा करण्यात आली आहे आणि वेळापत्रक आधीच जाहीर करण्यात आले आहे. मात्र, स्पर्धा सुरू होण्याच्या काही दिवस आधी एक मोठी अपडेट समोर आली आहे. संयुक्त अरब अमिरातीमधील हवामान लक्षात घेऊन सामन्यांच्या वेळेत बदल करण्यात आले आहेत.

आशिया चषकाचे सामने आता भारतीय वेळेनुसार रात्री ८ वाजता (स्थानिक वेळेनु-सार संध्याकाळी ६:३० वाजता) सुरू होतील. पूर्वी हे सामने संध्याकाळी ७:३० वाजता सुरू होणार होते, परंतु संयुक्त अरब अमिराती (यूएई) मधील उष्ण हवामान लक्षात घेऊन हा बदल करण्यात आला आहे. या निर्णयासाठी ब्रॉडकास्टरला विनंती करण्यात आली होती, जी त्यांनी स्वीकारली आहे. युएईमध्ये उष्णता आणि आर्द्रतेची पातळी क्रिकेट सामन्यांसाठी, विशेषतः खेळाडू आणि चाहत्यांसाठी आव्हानात्मक असू शकते.

दिवसा तापमान खूप जास्त असते, ज्यामुळे संध्याकाळीही उष्णतेचा प्रभाव कायम राहतो. ही परिस्थिती लक्षात घेता, आयोजकांनी सामन्यांचा वेळ अर्धा तास पुढे वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. जेणेकरून खेळाडूंना चांगल्या परिस्थितीत खेळण्याची संधी मिळेल आणि चाहत्यांनाही स्टेडियममध्ये आरामदायी अनुभव मिळेल.

## द्रविडकडून राजस्तान रॉयल्सच्या प्रशिक्षक पदाचा राजीनामा



मुंबई :भारतीय संघाला टी-२० वर्ल्ड चॅम्पिनय करणार्या राहुल द्रविडने मोठा अचानक मोठा निर्णय घेतला. आयपीएलच्या आगामी हंगामाआधी द्रविडने मुख्य प्रशिक्षक पदाचा राजीनामा दिला आहे. राजस्तान रॉयल्स फ्रँचायझी संघाने सोशल मीडियाच्या माध्यमातून या संदर्भातील अधिकृत माहिती दिली आहे. गेल्या काही दिवसांपासून संजू समॅमसन राजस्तानचा संघ सोडणार अशी चर्चा रंगत होती. पण अचानकच आता द्रविडने प्रशिक्षक पदाचा राजीनामा दिल्याचे समोर आले आहे.

राजस्तान रॉयल्सच्या संघाने जी पोस्ट शेअर केली. त्यात लिहले की, मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड़ आयपीएल २०२६ पूर्वी फ्रँचायझी बरोबरचा आपला कार्यकाळ संपवणार आहेत. अनेक वर्षांपासून राहुल द्रविड राजस्तान रॉयल्सच्या प्रवासाच्या केंद्रस्थानी राहिले. त्यांच्या नेतृत्वासह मार्गदर्शनात खेळाडूंच्या एका पिढीवर प्रभाव टाकला आहे.मोठ्या जबाबदारीसह मोठ्या पदाची ऑफर देऊनही द्रविड राजीनाम्याच्या निर्णयावर ठाम राहिला. २०१२ च्या हंगामात राहुल द्रविड कॅप्टन आणि खेळाडूच्या रुपात राजस्थान ताफ्यात सहभागी झाला. त्याच्या नेतृत्वाखाली २०१३ मध्ये राजस्तानच्या संघाने प्लेऑफ्स गाठली होती.

एवढेच नाही तर चॅम्पियन्स लीग टी-२० स्पर्धेत संघ फायनलमध्ये पोहचला होता. पण ट्रॉफी काही हाती लागलीच नाही. अजिंक्य रहाणे, संजू सॅमसन ते अगदी १४ वर्षीय वैभव सूर्यवंशीपर्यंत अनेक प्रतिभावंत खेळाडू घडवण्यात द्रविडचा मोलाचा वाटा आहे. पण आता तो राजस्तान रॉयल्स संघाचा भाग नसणार आहे.आयपीएलमधून निवृत्ती घेतल्यावर २०१४ आणि २०१५ च्या हंगामात द्रविड मेंटॉरच्या रुपात राजस्तान रॉयल्सच्या संघासोबत कनेक्ट झाला. त्यानंतर २०१६ च्या हंगामात तो दिल्लीच्या ताफ्यात सेवा देताना दिसला. भारतीय संघाच्या प्रशिक्षकपदी निवड झाल्यावर तो आयपीएल फ्रँचायझी संघाबातून दूर झाला. भारतीय संघाला टी-२० वर्ल्ड कप चॅम्पियन केल्यावर द्रविड पुन्हा राजस्थानच्या संघात सामील झाला होता. सप्टेंबर २०२४ मध्ये त्याची राजस्तान रॉयल्सच्या संघातील मुख्य प्रशिक्षकपदी नियुक्ती करण्यात आली होती. पण वर्षभराच्या आतच त्याने पदाचा राजीनामा दिला आहे.

## दिलशान मदुशंकाने टिपले सलग तीन गोलंदाज



हरारे : झिम्बाब्वे विरुद्धच्या पहिल्या वनडे सामन्यात श्रीलंकेचा जलदगती गोलंदाज दिलशान मदुशंका याने आपल्या गोलंदाजीची खास छाप सोडली. हरारेच्या मैदानात रंगलेल्या सामन्यात हॅटट्रिकचा डाव साधत त्याने श्रीलंकेच्या दिग्गजांच्या खास क्लबमध्ये एन्ट्री मारली आहे. श्रीलंकेकडून वनडेत हॅटट्रिकची कमाल करुन दाखवणारा तो आठवा गोलंदाज ठरला.

झिम्बाब्वे विरुद्धच्या सामन्यात अखेरच्या षटकात १० धावांचा बचाव करताना दिलशान मुदशंका याने तिघांना तंबूचा रस्ता दाखवला. डावखुर्या हाताच्या जलदगती गोलंदाजाने आधी ९२ धावांवर खेळणार्या सिकंदर रझा याची विकेट घेत सामना श्रीलंकेच्या बाजूनं फिरवला. त्यानंतर ब्रँड इवान्स आणि नगारवा यांच्या रुपात दोन विकेट्स घेत त्याने हॅटट्रिक पूर्ण केली. वनडेच्या इतिहासात ११ व्या वेळी श्रीलंकन गोलंदाजाने हॅटट्रिकचा डाव साधला आहे.

लसिथ मलिंगा आणि चमिंडा वास या दिग्गज गोलंदाजांनी वनडेत एकापेक्षा अधिक वेळा ही कामगिरी करुन दाखवलीये. पाच विकेट्स हातात असताना अखेरच्या षटकात झिम्बाब्वेला १० धावांची गरज होती. मदुशंकानं हॅटट्रिकसह मॅच फिरवली. त्याने या सामन्यात १० षटकात ६२ धावा खर्च करताना ४ बळी घेतल्या.

पहिल्या एका सामन्यात झिम्बाब्वेच्या संघाने नाणेफेक जिंकून पहिल्यांदा गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. श्रीलंकेच्या संघाने पहिल्यांदा बॅटिंगची वेळ आल्यावर निर्धारित ५० षटकात ६ बळीच्या मोबदल्यात २९८ धावा करत घरच्या मैदानात खेळणार्या झिम्बाब्वेसमोर २९९ धावांचे टार्गेट सेट केले होते. या धावांचा पाठलाग करताना झिम्बाब्वेचा संघ ८ बळींच्या मोबदल्या २९१ धावांपर्यंत मजल मारू शकला.

श्रीलंकेकडून हॅटट्रिकचा डाव साधणारे गोलंदाज

चमिंडा वास विरुद्ध झिम्बाब्वे (२००१); बांगलादेश (२००३)

लसिथ मलिंगा विरुद्ध दक्षिण आफ्रिका (२००७); केनिया (२०११); ऑस्ट्रेलिया (२०११)

फरवीज महारूफ विरुद्ध भारत (२०१०)

थिसारा परेरा विरुद्ध पाकिस्तान (२०१२)

वानिंदु हसरंगा विरुद्ध झिम्बाब्वे (२०१७)

शेहान मदुशंका - विरुद्ध बांगलादेश (२०१८)

महेश तीक्षणा विरुद्ध न्यूझीलंड (२०२५)

दिलशान मदुशंका - विरुद्ध झिम्बाब्वे (२०२५)

## पंतप्रधान मोदींचे चेतेश्वर पुजाराला निवृत्तीनंतर पत्र



दिल्ली-पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारता-चा माजी फलंदाज चेतेश्वर पुजाराला पत्र लिहून त्याने त्याच्या आंतरराष्ट्रीय क्रिकेट कारकिर्दीत केलेल्या कामगिरीचे कौतुक केले आहे. पुजाराने गेल्या रविवारी १०३ कसोटी सामन्यांच्या त्याच्या दमदार कारकिर्दीला निरोप दिला. पंतप्रधान मोदींनी त्यांच्या पत्रात लिहिले आहे की, ''हा काळ टी २० आणि एकदिवसीय क्रिकेटच्या वर्चस्वाचा काळ आहे आणि अशा काळात पुजाराच्या फलंदाजीने नेहमीच कसोटी क्रिकेटचे सौंदर्य जिवंत ठेवले. त्याच्या अढळ एकाग्रता आणि संयमाने त्याला भारतीय फलंदाजी एक मजबूत आधारस्तंभ बनवले.''पुजाराने हे पत्र सोशल मीडियावर शेअर केले आणि पंतप्रधानांच्या प्रेरणादायी शब्दांबद्दल त्यांचे आभार मानले. मोदींनी त्यांच्या संदेशात विशेषत: २०१८ आणि २०२१ मध्ये ऑस्ट्रेलियामध्ये झालेल्या ऐतिहासिक कसोटी मालिका विजयांचा उल्लेख केला. ते म्हणाले की, ''कठीण परिस्थितीतही पुजारा टीम इंडियाला भक्कमपणे उभा राहिला आणि आणि सर्वात आक्रमक गोलंदाजांविरोधात खंबीरपणे उभा राहिला.''पंतप्रधानांनी असेही लिहिले की, ऑस्ट्रेलियात खेळल्या गेलेल्या कसोटी सामन्यांची चाहते नेहमीच आठवण ठेवतील, जिथे पुजाराने आपल्या आक्रमक फलंदाजीने भारताच्या ऐतिहासिक विजयाचा पाया रचला. मोदींनी पुजाराच्या देशांतर्गत क्रिकेटमधील कामगिरीचेही कौतुक केले. ते म्हणाले की, ''आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू असूनही, पुजाराने नेहमीच सौराष्ट्र आणि परदेशी लीगमध्ये प्रथम श्रेणी क्रिकेट खेळणे पसंत केले.

## तुझ्या पोटी जन्माला आलो म्हणून मी घडलो : सचिन तेंडुलकर



मुंबई : क्रिकेट जगतातील सर्वोत्तम फलंदाज अन् विक्रमादित्य सचिन तेंडुलकर याने आयुष्यातील सर्वात मौल्यवान क्षण आपल्या चाहत्यांसोबत शेअर केला. सचिन तेंडुलकर याने खास फोटो ओळ देत दोन फोटो शेअर करत आई बद्दल मनातील भावना व्यक्त केली आहे. निमित्त होते ते म्हणजे रजनी तेंडुलकर यांचा वाढदिवस.क्रिकेटमध्ये अधिराज्य गाजवणार्या सचिन तेंडुलकरच्या प्रव-ासात कुटुंबियांतील प्रत्येक सदस्याचे खास योगदान राहिले आहे. हा प्रवास आईच्या आशीर्वादाशिवाय शक्य नव्हता, अशा आशयाची खास पोस्ट तेंडुलकरने शेअर केली आहे. सचिन तेंडुलकरने जे दोन फोटो शेअर केले आहेत त्यात तो आईच्या अगदी बाजूला उभे असल्याचे दिसते.दुसर्या फोटोत सचिन आईला केक भरवताना दिसतो. खास कॅप्शनसह फोटो शेअर करताना सचिनने लिहिले की, तुझ्या पोटी जन्मलो म्हणून मला एक यशस्वी क्रिकेटपटू होता आले आणि मी घडलो. तुझ्या आशिर्वादने मला माझ्या आयुष्यात यशस्वी होता आहे. सचिनने शेअर केलेल्या फोटोमध्ये पुन्हा एकदा होणार्या सूनबाईची झलक पाहायला मिळते. अर्जुन तेंडुलकर, अंजली तेंडुलकर आणि साराशिवाय सानिया चांडेक ही देखील तेंडुलकर फॅमिलीच्या खास कार्यक्रमात उपस्थितीत होती.

अर्जुन तेंडुलकर आणि सानिया चांडोक यांचा नुकताच साखरपुडा झाला. सचिन तेंडुलकरनं या गोष्टीची पुष्टीही केलीये. त्यानंतर सातत्याने होणारी सूनबाई सचिनने शेअर केलेल्या फोटोतील फ्रेममध्ये दिसली आहे. याआधी तेंडुलकरने लेक साराच्या पीलेट्स स्टुडिओतील फोटो शेअर केले होते. त्यावेळीही सानिया तेंडुलकर कुटुंबियांसोबत दिसली होती.

## लखनऊच्या पठ्ठ्याने अख्खी मॅच फिरवली, डबल सेंच्यूरी ठोकून ड्रॉ झालेला सामना जिंकवला



लखनऊ-दुलीप ट्रॉफी स्पर्धेतील क्वार्टर फायनल सामन्यात लखनऊ सूपर जाएट्सच्या आयुष बदोनीने खतरनाक खेळी केली आहे. आयुष बदोनीने डबल सेंच्युरी मारली आहे. त्याच्या या सेंच्युरीमुळे सामना ड्रॉ ठरला. पण हा सामना ड्रॉ होऊन देखील नॉर्थ झोन-ने सेमी फायनलमध्ये धडक मारली आहे. त्यामुळे हे कसं शक्य झालं आहे. हे जाणून घेऊयात.खरं तर नॉर्थ झोनने दुसऱ्या डावात फलंदाजी करताना ४ विकेट गमावून ६५८ धावा केल्या होत्या आणि ८३३ धावांची भक्कम आघाडी घेऊन डाव घोषित केला होता. या धावा करण्यात आयुष बदोन-ीने मोलाची भूमिका बजावली होती.आयुष बदोनीने २२३ बॉलमध्ये २०४ धावांची नाबाद खेळी केली होती. या खेळीत त्याने ३चौकार आणि १३ चौकार लगावले होते. आयुष सोबत कर्णधार अंकित कुमारने १९८ धावांची खेळी होती. आणि यश धुलने १३३ धावांची शतकीय खेळी केली होती. यावेळी बदोनीने डबल सेंच्यूरी ठोकताच डाव घोषित करण्यात आला होता. शेवटच्या दिवशी निकाल लागणे शक्य नव्हतं.त्यामुळे हा सामना ड्रॉ घोषित करण्यात आला होता.पहिल्या डावात घेतलेल्या भक्कम आघाडीच्या बळावर नॉर्थ झोनने स्पर्धेतील सेमीफायनलमध्ये आपलं स्थान पक्कं केलं आहे. त्यामुळे नॉर्थ झोन दुलीप ट्रॉफी २०२५ स्पर्धेतील सेमी फायनलमध्ये पोहोचली आहे. आता सेमी फायनलमध्ये त्यांचा सामना साऊथ झोनविरूद्ध होणार आहे.दरम्यान ईस्ट झोनचा पहिला डाव २३० धावांवर ऑल आऊट झाला होता. ईस्ट झोनकडून फक्त विराट सिंहने ६९ धावांची खेळी केली होती.या खेळाडू व्यतिरीक्त इतर कोणत्याही खेळाडूला मोठी खेळी करता आली नव्हती. नॉर्थ झोनकडून अकीब नबीने एकट्याने ५ विकेट घेतल्या होत्या. हर्षित राणाने २ आणि अर्शदिप सिंह, मयंक डागर आणि निशांत संधूने प्रत्येकी एक विकेट घेतली होती. तर नॉर्थ झोनने पहिल्या डावात ४०५ धावा ठोकल्या होत्या.त्यात ईस्ट झोन २३० वरच ऑल आऊट झाल्याने नॉर्थ झोननेकडे दुसऱ्या डावात मोठी आघाडी मिळाती होती. दरम्यान पहिल्या डावात नॉर्थ झोनकडून कन्हैया वाधवानकडून ७६ धावांची तर आयुष बदोनीने ६३ धावांची खेळी केली होती.पण दुसऱ्या डावात बदोनीने ठोकलेल्या डबल सेंच्यूरीने मॅच फिरली होती.

## नीरज चोप्रा दुसऱ्या स्थानावर



नवी दिल्ली : डायमंड लीग २०२५ स्पर्धेत नीरज चोप्राने जोर लावला, पण शेवटी कट्टर प्रतिस्पर्धी असलेल्या जर्मनीच्या जूलियन वेबरने एकदा नव्हे तर दोन वेळा ९० पार अंतर कापणारा भाला फेकत या स्पर्धेत फायनल बाजी मारली. पहिल्या पाच प्रयत्नानंतर नीरज चोप्रा तिसर्या स्थानावर होता. पण अखेरच्या थ्रोसह त्याने दुसर्या स्थानावर कब्जा केला. डायमंड लीग स्पर्धेत सलग तिसर्यांदा भारताचा गोल्डन बॉय नीरज चोप्रा याला दुसर्या स्थानावर समाधान मानावे लागले आहे.

डायमंड लीगच्या फायनलमध्ये पहिल्या प्रयत्नातच जूलियन वेबरनं ९१.३७ मीटर अंतरावर भाला फेकला. दुसरीकडे नीरज चोप्राला मात्र पहिल्या प्रयत्नात फक्त ८४.३५ मीटर अंतर कापता आले. नीरजचा दुसरा थ्रो ८२ मीटरवर आला. त्यानंतर तीन प्रयत्न फाउल ठरल्यामुळे नीरज चोप्रासमोर मोठ चॅलेंज उभा राहिले. एका बाजूला नीरज जोर लावण्यात कमी पडत असताना जर्मनीच्या पठ्ठ्यानं दुसर्या प्रयत्नात ९१.५७ एवढ्या अंतरावर भाला फेकत अव्वलस्थानावरील आपली दावेदारी आणखी भक्कम केली अन् शेवटी बाजीही मारली. ही त्याची सर्वोत्तम कामगिरीही ठरली. डायमंड लीग स्पर्धेतील फायलमध्ये अखेरच्या प्रयत्नात नीरज चोप्रानं ८५.०१ एवढ्या अंतरावर भाला फेकत नंबर दोनवर राहण्याचा डाव साधला. या कामगिरीसह त्याने त्रिनिदाद अँण्ड टॉबेगोच्या २०१२ च्या लंडन ऑलिम्पिक विजेत्या केशोर्न वाल्कोट याला मागे टाकले. त्याने ८४.९५ मीटर भाला फेकला.डायमंड लीगमध्ये सलग तिसर्यांदा नीरज चोप्रावर दुसर्या क्रमांकावर समाधान मानण्याची वेळ आली आहे. डायमंड लीग स्पर्धेत एकदा नव्हे तर दोन वेळा ९० पारचा डाव साधत वेबरनं जेतेपद तर मिळवलेच. पण त्याची ही कामगिरी आगामी वर्ल्ड चॅम्पियनशिप स्पर्धेआधी भारतीय भालाफेकपटूला टेन्शन देणारी अशीच आहे. पुढच्या महिन्यात हे दोन्ही खेळाडू पुन्हा समोरासमोर येतील. त्याला मात द्यायची असेल तर फक्त ९० पारच लक्ष पार करून चालणार नाही तर नीरज चोप्राला आणखी जोर लावावा लागेल.

# श्री रामदेव बाबा मंदिर येथे भाद्रपद मेळा



**लातूर/प्रतिनिधी :** प्रती वर्षाप्रमाणे याही वर्षी भाद्रपद शुक्ल नवमी व भाद्रपद शुक्ल दशमी निमित्त, सोमवार दि. ०१ सप्टेंबर २०२५ रोजी रात्री ९.३० वाजता श्री रामदेव बाबा भजन मंडळाचा जम्मा जागरणाचा कार्यक्रम व मंगळवार दि. ०२ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ७.३१ वाजता श्री ची ध्वजा चढविणे, श्री रामदेव बाबांची आरती, होम-हवन व प्रसाद वितरणाचा कार्यक्रम आयोजीत करण्यात आलेला आहे. तरी सर्व भक्तांनी या सत्संगाचा लाभ घ्यावा, अशी विनंती विश्वस्त श्री रामदेवबाबा मंदीर, औसा रोडच्या वतीने करण्यात आलेली आहे.

# राजा नारायण लाल लाहोटी इंग्लिश स्कूलमध्ये स्पोर्ट दिवस साजरा



**लातूर/प्रतिनिधी :** राजा नारायण लाल लाहोटी इंग्लिश स्कूलमध्ये स्पोर्ट दिवस साजरा.

लातूर- प्रथम मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेस रजिस्टर प्रवीण शिवणगीकर यांच्या हस्ते पुष्पहार घालून खरीकल्पाची सुरुवात करण्यात आली. राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूलमध्ये मेजर ध्याचंद यांच्या जयंतीनिमित्त विविध खेळ घेऊन स्पोर्ट दिवस साजरा करण्यात आला. याप्रसंगी विविध खेळातील विद्यार्थी यांनी आपले प्रात्यक्षिक करून दाखवले. शाळेतील स्पोर्ट टीचर सुनील यांनी विद्यार्थ्यांना खेळाचे मार्गदर्शन करून शाळेतील विद्यार्थी विविध खेळात पारंगत असून ते प्रत्येक खेळ उंचावत असतात. याप्रसंगी बोलताना शिवनगीकर यांनी बोलताना एक विद्यार्थ्यांच्या जीवनात खेळ आवश्यक असतो खेळ हा सर्वांना आवश्यक असतो आपल्या आरोग्य राखण्यासाठी व आपली प्रगती करण्यासाठी खेळ हा खूप अतिशय महत्त्वाचा आहे. तसेच शाळेत प्रत्येक खेळ खेळला जातो व प्रत्येक विद्यार्थ्यांनी खेळला पाहिजे असे मत व्यक्त केले. याप्रसंगी उपस्थित सुनील सर. अशीद बनसोडे, पोतनीस सर, ज्ञानेश्वर सर विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# दयानंद मध्ये इन्स्टिट्युटेशन इनोव्हेशन कौन्सिल यांच्यातर्फे इनोव्हेशन टू स्टार्ट-अप डेव्हलपमेंट वेबिनार

**लातूर/प्रतिनिधी :** आजच्या तरुण पिढीसमोर रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी उद्योजकतेचा मार्ग अधिक उपयुक्त ठरतो.या पार्श्वभूमीवर दयानंद विज्ञान महाविद्यालय,लातूर येथील भौतिकशास्त्र व इलेक्ट्रॉनिक्स विभाग आणि इन्स्टिट्युटेशन इनोव्हेशन कौन्सिल (आयआयसी) यांच्या संयुक्त विद्यमाने ''इनोव्हेशन टू स्टार्ट-अप डेव्हलपमेंट '' या विषयावर मार्गदर्शनपर वेबिनारचे आयोजन करण्यात आलेले होते.या वेबिनारचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांनी भूषविले.प्रमुख वक्ते म्हणून डॉ.अभय देशमुख,राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर युनिव्हर्सिटी,नागपूर यांनी विद्यार्थ्यांना नावीन्यपूर्ण कल्पनांना व्यावहारिक स्वरूप देऊन त्या यशस्वी स्टार्ट-अपमध्ये कशा रुपांतरित करता येतात,याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच उद्योजकतेतील संधी,आव्हाने,निधी उभारणी व शासनाच्या विविध योजना तसेच बाजारपेठेतील संधी याबद्दलही सविस्तर मार्गदर्शन केले.त्यांनी आपल्या अनुभवातून विद्यार्थ्यांना नव्या व्यवसाय कल्पना शोधण्याची प्रेरणाही दिली.या वेबिनारला विद्यार्थ्यांचा व प्राध्यापकवर्गाचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.प्रश्नोत्तर सत्रात विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेतला.विद्यार्थ्यांनी सक्रियपणे सहभाग घेत आपल्या शंकांचे निरसन केले.या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये नवी ऊर्जा व आत्मविश्वास निर्माण झाला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन कार्यक्रम समन्वयक डॉ. टी.एच.मुजावर,इलेक्ट्रॉनिक्स विभाग प्रमुख यांनी केले,तर आभार प्रदर्शन डॉ.एस.डी.लोखंडे यांनी केले.

वेबिनारला महाविद्यालयातील व महाविद्यालयाव्यतिरिक्त ५० विद्यार्थी, प्राध्यापकवर्ग उपस्थित होते.सदरील कार्यक्रमाकरिता भौतिकशास्त्र विभाग प्रमुख डॉ.विजेंद्र चौधरी,डॉ.व्ही.डी.मोटे,डॉ.एस.डी.बिराजदार,डॉ.महादेव पंडगे,प्रा.मेघा अत्राम,प्रा.डॉ.दीप्ती ढेरे,आयआयसी समन्वयक डॉ.श्रेयस माहूरकर,डॉ.रेश्मा धनवडे,सोलापूर विद्यापीठ,सोलापूर,डॉ.दिनेश शिंदे,केबीपी महाविद्यालय,पंढरपूर हे देखील ऑनलाईन पद्धतीने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी त्यांचे देखील सहकार्य लाभले.

# माजी मंत्री आमदार संभाजी पाटील निलंगेकर यांनी केली धनेगाव नुकसानीची पाहणी

**निलंगा/आयुब बागवान :** मांजरा नदीच्या वाढलेल्या जलपातळीमूळे धनेगावसह आसपासच्या परिसरात पुराचे पाणी घुसून मोठे नुकसान झाले आहे. माजी मंत्री आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी आज शनिवारी या पूरग्रस्त भागाला भेट देऊन नुकसानाची पाहणी केली. बाधित कुटुंबियांशी संवाद साधून सर्वांना धीर व पूर्ण सहकार्याचे वचन दिले.

परिस्थती बिकट आहे. परंतु आपण सर्वजण एकत्रितपणे पुढे जाऊ व यातून मार्ग काढूया, असा विश्वास सर्वांना दिला. याचबरोबर मांजरा धरणातून सातत्याने पाण्याचा विसर्ग सुरु आहे. त्यामुळे नागरिकांनी सतर्क तसेच प्रशासनाच्या संपर्कात राहण्याचे आवाहन यावेळी आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी सर्वांना केले.

यावेळी उपविभागीय अधिकारी शरद झाडके, तहसिलदार प्रसाद कुलकर्णी, देवणी तहसिलदार सोमनाथ वाडकर, गट विकास अधिकारी पंचायत समिती सोपान अकेले, देवणी पोलीस निरीक्षक गायकवाड , जिल्हा सरचिटणीस संजय दोरवे, जिल्हा उपाध्यक्ष शेषेराव ममाळे, सुमित ईनानी, देवणी बाजार समितीचे सभापती सदाशिव पाटील, देवणी तालुकाध्यक्ष शिवराज बिरादार, माजी जिल्हा परिषद सदस्य प्रशांत पाटील, राजजी गुणाले, युवा मोर्चाचे अध्यक्ष रामलिंग शेरे यांच्यासह स्थानिक ग्रामस्थ उपस्थित होते.



# बळवंतराव जोतीराम कदम यांच्या स्मरणार्थ मुलींच्या वसतिगृहाला एक लाखाची देणगी



**निलंगा/आयुब बागवान :** निलंगा तालुक्यातील शिरोळ वांजरवाडा गावचे रहिवासी. लातूरला स्थायिक असलेले बळवंतराव कदम यांचे गेल्या वर्षी निधन झाले होते .ते जिल्हा परिषदेला शिक्षक, मुख्याध्यापक, व केंद्रप्रमुख म्हणून कार्यरत होते. तसेच निलंगा पतसंस्थेचे ते डायरेक्टर म्हणून त्यांनी काम केले होते. त्यांना अनेक पुरस्कार मिळाले होते. अनेक सामाजिक उपक्रम शैक्षणिक उपक्रम त्यांच्या कालावधीत राबवली गेले होते. म्हणून त्यांच्या पश्चात त्यांची पत्नी पुष्पा बळवंतराव कदम, चिरंजीव अतुल बळवंतराव कदम, निता बळवंतराव कदम ,व वर्षा बळवंतराव कदम,विधीतम साळुंके, प्रणिता अतुल कदम, आयन अतुल कदम, दीपक साळुंके यांनी लातूर येथील मराठा सेवा संघाच्या मुलींच्या वस्तीगृहासाठी एक लाखाची देणगी प्रथम पुण्यस्मरण निमित्त मराठा सेवा संघाचे मार्गदर्शक शिवश्री लिंबराज सूर्यवंशी अध्यक्ष रोहन जाधव सचिव जाधव एम एम यांच्याकडे व टीमकडे सुपूर्द केला. यावेळी लातूर पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी जाधव निवृत्ती ,कीर्तनकार काळे बाळकृष्ण,मराठा सेवा संघाचे वैभवदादा तळेकर,ऋषी कदम , जगद्गुरु तुकोबाराय साहित्य परिषदेचे बरमदे डी.बी.जिजाऊ ब्रिगेडच्या बोराडे ताई, समाधान माने, पंजाबराव देशमुख शिक्षक परिषदेचे जाधव डी व्ही, जाधव ए पी, प्रभाकर जाधव, बरमदे आर एन, हंगारगे पी एस, कमलाकर सूर्यवंशी, शिवाजीराव पाटील व कदम परिवारातील नातेवाईक उपस्थित होते.

# दयानंद विज्ञानमध्ये मॉरिस हिलमन यांची जयंती साजरी

**लातूर/प्रतिनिधी :** येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयात दि.३० ऑगस्ट २०२५ रोजी मॉरिस हिलमन यांची १०६ वी जयंती साजरी करण्यात आली.वैज्ञानिकांच्या जयंतीनिमित्त त्यांनी केलेल्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करून अभिवादन करण्याचा हा उपक्रम महाविद्यालय आपले कर्तव्य म्हणून मागील २ वर्षांपासून राबवत आहे. विद्यार्थी वैज्ञानिकांच्या संशोधनातून प्रेरणा घेऊन विज्ञान व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात कार्य करून स्वतःबरोबरच महाविद्यालयाचेही नावलौकिक करतील असे उद्दिष्ट समोर ठेवून हा उपक्रम अविरतपणे सुरू आहे. कार्यक्रमाची सुरुवात बायोटेक्नॉलॉजी विभागाच्या विभाग प्रमुख प्रा.अवंती बिडकर यांनी वैज्ञानिकाच्या प्रतिमेस वंदन करून केली.यावेळी विभागातील बी.एस्सी.प्रथम वर्षातील विद्यार्थीनी स्वाती दळवे हिने मॉरिस हिलमन यांचे योगदान स्पष्ट केले.

मॉरिस हिलमन हे अमेरिकन सूक्ष्मजीवशास्त्रज्ञ व लसीशास्त्रज्ञ होते,ज्यांनी आधुनिक लसीशास्त्राला नवे रूप दिले.त्यांचा जन्म ३० ऑगस्ट १९१९ रोजी मोंटाना,अमेरिका येथे झाला.त्यांनी आपल्या आयुष्यात ४० हून अधिक लसी विकसित केल्या,त्यापैकी २० पेक्षा जास्त लसी आजही जगभर वापरल्या जातात.गोवर,गलगंड,रुबेला



यांची त्रिसंयुक्त लस तसेच हेपाटायटिस-बी,मेंनिंजायटिस,न्यूमोनिया,चिकनपॉक्स व इंफ्लुएंझा यासारख्या गंभीर आजारांविरुद्ध लसी विकसित करण्यात त्यांचा मोठा वाटा आहे.त्यांच्या संशोधनामुळे जगभरातील कोट्यवधी बालकांचे प्राण वाचले आणि सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेत क्रांती घडली. त्यांना १९८८ साली ''नॅशनल मेडल ऑफ सायन्स '' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.११ एप्रिल २००५ रोजी त्यांचे निधन झाले,तरीही''जगात सर्वाधिक जीव वाचवणारा शास्त्रज्ञ'' म्हणून त्यांचे कार्य आजही मानवजातीसाठी प्रेरणादायी आहे.याप्रसंगी विभागातील प्रा.डॉ.फिरदौस बिरादार,प्रा.ऋतुजा डिग्रसकर,प्रा.अनुराधा शिंदे,प्रा.तृप्ती सोनकांबळे,प्रा.आऊ येळीकर व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच पदवी आणि विभागातील विद्यार्थी उपस्थित होते.

# 'सारथी' मुळे स्पर्धा परीक्षेतील यशाचा मार्ग सुकर!

मराठा, कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक उन्नतीसाठी २०१८ मध्ये स्थापन झालेल्या छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण आणि मानव विकास संस्थेने (सारथी) विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळवण्यासाठी एक भक्कम व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे. 'शाहू विचारांना देऊया गती, साधूया सर्वांगीण प्रगती' या ब्रीदवाक्यासह कार्यरत असलेली ही संस्था विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना बळ देणारी खरी 'सारथी' ठरली आहे. केंद्रीय लोकसेवा आयोग, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, बँकिंग, कर्मचारी निवड आयोग आणि इतर स्पर्धा परीक्षांसाठी मार्गदर्शन, प्रशिक्षण आणि आर्थिक सहाय्य देऊन 'सारथी'ने विद्यार्थ्यांचा यशाचा मार्ग सुकर केला आहे.

**स्पर्धा परीक्षांसाठी सर्वंकष मार्गदर्शन**

'सारथी'ने स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी सर्वंकष उपाययोजना राबवल्या आहेत. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा परीक्षेसाठी नवी दिल्ली आणि पुणे येथील नामांकित प्रशिक्षण संस्थांमध्ये एक हजार विद्यार्थ्यांना ११ महिन्यांचे प्रशिक्षण दिले जाते. या प्रशिक्षणाचे संपूर्ण शुल्क 'सारथी'द्वारे दिले जाते, ज्यामुळे विद्यार्थ्यांचा आणि त्यांच्या पालकांचा आर्थिक बोजा कमी होतो. याशिवाय, प्रत्येक विद्यार्थ्याला आकस्मिक खर्चासाठी १८ हजार रुपये, प्रवास खर्चासाठी १० हजार रुपये आर्थिक सहाय्य दिले जाते. मुख्य परीक्षा आणि मुलाखतीसाठी पात्र होणाऱ्या विद्यार्थ्यांना दरमहा १३ हजार रुपये विद्यावेतन मिळते. तसेच सारथी मार्फत अभिरूप मुलाखतींद्वारे विद्यार्थ्यांची अधिकची तयारी करून घेतली जाते. याचा परिणाम म्हणून, २०२४ च्या केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या निकालात १७ विद्यार्थ्यांची अंतिम निवड झाली, तर आतापर्यंत १२८ विद्यार्थी या परीक्षेत यशस्वी झाले आहेत.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या राज्य सेवा, न्यायिक सेवा, अभियांत्रिकी सेवा, कृषी सेवा आणि वन सेवा यांसारख्या परीक्षांसाठीही 'सारथी' प्रशिक्षण आणि आर्थिक सहाय्य पुरवते. प्रशिक्षण शुल्क, मासिक विद्यावेतन आणि आकस्मिक खर्चासाठी स्वतंत्र निधी उपलब्ध करून दिला जातो. मुख्य परीक्षा आणि मुलाखतीसाठी पात्र विद्यार्थ्यांना एकरकमी सहाय्य मिळते. यामुळे आतापर्यंत १ हजार ४९ विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या राज्यसेवा परीक्षेत यश मिळवून शासन सेवेत रुजू झाले आहेत.

सारथी

"शाहू - विचारांना देवूया गती साधुया सर्वांगीण प्रगती"

**बँकिंग आणि इतर परीक्षांसाठी सहाय्य**

'सारथी' केवळ केंद्रीय आणि राज्य लोकसेवा आयोगापुरते मर्यादित नसून बँकिंग, कर्मचारी निवड आयोग आणि विद्यापीठ अनुदान आयोगाच्या राष्ट्रीय पात्रता परीक्षा आणि राज्य पात्रता परीक्षा यांसारख्या इतर स्पर्धा परीक्षांसाठीही प्रशिक्षण आणि आर्थिक सहाय्य पुरवते. या परीक्षांच्या पूर्वप्रशिक्षणासाठी शुल्क आणि मासिक विद्यावेतन दिले जाते, ज्यामुळे विद्यार्थ्यांना आर्थिक अडचणींना सामोरे न जाता तयारीवर लक्ष केंद्रित करता येते.

**प्रशिक्षणाची प्रभावी व्यवस्था**

'सारथी'चे मुख्य कार्यालय पुणे येथे असून, कोल्हापूर, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, नागपूर, नाशिक, मुंबई (खारघर, नवी मुंबई) आणि लातूर येथे विभागीय कार्यालये आहेत. या कार्यालयांमार्फत प्रशिक्षण कार्यक्रम आणि योजनांची प्रभावी अंमलबजावणी केली जाते. राज्य शासनाच्या नियोजन विभागाच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असलेली ही संस्था विद्यार्थ्यांना केवळ आर्थिकच नव्हे, तर मानसिक आणि शैक्षणिक आधार देणारी ठरली आहे. प्रशिक्षणासाठी निवडलेल्या विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे मार्गदर्शन, अद्ययावत अभ्याससाहित्य आणि तज्ज्ञ शिक्षकांचे सहकार्य मिळते.

**यशस्वी विद्यार्थ्यांचा प्रेरणादायी प्रवास**

'सारथी'च्या या सर्वंकष प्रयत्नांमुळे अनेक विद्यार्थ्यांनी आपली स्वप्ने साकार केली आहेत. केंद्रीय आणि राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षांमध्ये यश मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सातत्याने वाढत आहे. विशेषतः आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना 'सारथी'च्या योजनांमुळे स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी आवश्यक संसाधने आणि आत्मविश्वास मिळाला आहे. यामुळे ग्रामीण आणि शहरी भागातील विद्यार्थ्यांना समान संधी उपलब्ध झाल्या आहेत.

'सारथी'ने केवळ स्पर्धा परीक्षांपुरते योगदान दिलेले नाही, तर समाजातील दुर्बल घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठीही महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. शैक्षणिक आणि आर्थिक सक्षमीकरणाद्वारे विद्यार्थ्यांना स्वावलंबी बनवण्याचे उद्दिष्ट 'सारथी'ने यशस्वीपणे साध्य केले आहे. या योजनांचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांना आणि पालकांना सारथीच्या संकेतस्थळावरून माहिती मिळवून अर्ज करण्याचे आवाहन लातूर येथील विभागीय कार्यालयाच्या उप व्यवस्थापकीय संचालक श्रीमती अहिल्या गाठाळ यांनी केले आहे.

'सारथी' ही संस्था खऱ्या अर्थाने विद्यार्थ्यांचा 'सारथी' बनली आहे. स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी आवश्यक आर्थिक, शैक्षणिक आणि मानसिक आधार देऊन ती विद्यार्थ्यांना यशाच्या शिखरापर्यंत पोहोचवत आहे. 'सारथी'च्या या प्रयत्नांमुळे मराठा, कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा समाजातील विद्यार्थ्यांचा यशाचा मार्ग सुकर झाला आहे, आणि भविष्यातही हा प्रवास अधिक गतिमान होईल, यात शंका नाही.

**-तानाजी घोलप,**
**प्रभारी जिल्हा माहिती अधिकारी,**
**लातूर**

पान २ वरून...

# गुणवत्तापूर्ण शिक्षणव्यवस्था लोकाभिमुख करण्यावर भर !

कुणबी-मराठा प्रवर्गातील एकत्रितपणे ७५ विद्यार्थ्यांना प्रतीवर्षी परदेशी शिष्यवृत्ती मंजूर करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे. सदरची योजना छत्रपती शाहू महाराज व मानव विकास संस्था (सारथी), पुणे या शासनाच्या संस्थेमार्फत ''सयाजीराव गायकवाड-सारथी गुणवंत मुला-मुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना'' या नावाने शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून राबविण्यात येत आहे. सारथी संस्थेमार्फत राज्यातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा या लक्षित गटातील विद्यार्थ्यांकरिता डॉ. पंजाबराव देशमुख सारथी उच्च शिक्षण देशांतर्गत शिष्यवृत्ती सन २०२२-२३ पासून २०० शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेशित पात्र विद्याध्यर्थ्यांना ही शिष्यवृत्ती लागू करण्यात आली आहे.

महाराष्ट्रातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा प्रवर्गातील जे गुणवंत विद्यार्थी पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी मान्यता प्राप्त २०० शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेतील अशा पात्र ३०० विद्यार्थ्यांना प्रतीवर्षी देशांतर्गत शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते. सदरची योजना छत्रपती शाहू महाराज व मानव विकास संस्था (सारथी), पुणे या शासनाच्या संस्थेमार्फत ''डॉ. पंजाबराव देशमुख सारथी देशांतर्गत उच्च शिक्षण शिष्यवृत्ती योजना या नावाने शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून राबविण्यात येत आहे.

देशाच्या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंतर्गत भारतातील शिक्षण क्षेत्रात ऐतिहासिक परिवर्तनाची सुरुवात झाली आहे. देशातील एकूण नोंदणी गुणोत्तर ५०% पर्यंत नेण्याचे राष्ट्रीय उद्दिष्ट गाठण्यासाठी, भारताने जागतिक दर्जाचे शिक्षण आणि संशोधन भारतातच उपलब्ध करून देण्यासाठी धोरणात्मक पावले उचलली आहेत. महाराष्ट्रातही विविध अभिनव आणि परिवर्तनशील उपक्रम शिक्षण क्षेत्रात राबविले आहेत. यामध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि विद्यार्थ्यांपर्यंत संधींची समान उपलब्धता आणि संशोधनाला चालना यावर अधिक भर देऊन गुणवत्तापूर्ण शैक्षणिक बदल करून राज्यातील शिक्षण व्यवस्था लोकाभिमुख केली जात आहे.

**काशीबाई थोरात-धायगुडे**
विभागीय संपर्क अधिकारी
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
मंत्रालय, मुंबई -३२


प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# मराठवाड्याचा अनुशेष भरून काढण्यासाठी सर्वपक्षीय बैठक लातूर येथे संपन्न

**लातूर/प्रतिनिधी :** येथील महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाच्या सभागृहामध्ये लातूर जिल्ह्यातील सर्वपक्षीय प्रमुख नेत्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. सदरील बैठक मराठवाडा जागरण समितीच्या वतीने संयोजक जिल्हा परिषदेचे माजी सदस्य नामदेव पाटील मोईज भाई शेख यांच्या टीमने केले होते .या बैठकीसाठी लातूर लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉक्टर शिवाजीराव काळगे हे अध्यक्षस्थानी होते याप्रसंगी काँग्रेस पक्षाच्या वतीने अभिजीत देशमुख, भारतीय जनता पार्टीच्या वतीने शिवाजीराव पाटील कव्हेकर ,

शिवसेनेच्या वतीने जिल्हाप्रमुख शिवाजीराव माने, शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ विधीज्ञ उदय गवारे, राष्ट्रवादी पक्षाच्या वतीने विधिज्ञ व्यंकटराव बेद्रे, राष्ट्रवादीचे संजय शेटे, सामाजिक कार्यकर्ते विनोद खटके महात्मा बसवेश्वरा महाविद्यालयाचे प्राचार्य तसेच रोडगे सर ज्येष्ठ पत्रकार जयप्रकाशजी दगडे साहेब शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख विष्णू साबदे असे अनेक पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी मराठवाड्याचा अनुशेष भरून काढण्यासाठी मराठवाड्यातील सर्वांगीण विकासासाठी तीन लाख कोटींचा असणारा अनुशेष कशा पद्धतीने भरून काढून मराठवाड्याचा सार्वजनिक विकास केला जाईल यासाठी सर्व पक्षाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांनी आपापल्या पक्षाच्या नेत्यामार्फत खास करून सत्तेत असणारे भारतीय जनता पार्टी शिवसेना राष्ट्रवादी महायुतीच्या पदाधिकाऱ्यांनी



आपल्या मंत्र्याला मुख्यमंत्र्यांना विनंती करून मराठवाड्याचा अनुशेष भरून काढावा मराठवाड्यावर नेहमीच दुष्काळाचा सावट अतिवृष्टीचे सावट शेतकऱ्याच्या अनंत अडचणी अशा अनेक बाबीवर संकटाची मालिका मराठवाड्यावर नेहमीच असते अशातच शासनाकडून तीन लाख कोटी चा अनुशेष आज शिल्लक आहे हा अनुशेष भरून काढण्यासाठी आपणा सर्वांचे जबाबदारी आहे. मराठवाड्याचा मी निश्चित देणे लागतो या भावनेतून संयोजक श्री पाटील नामदेव व मोईज भाई यांनी अत्यंत चांगल्या पद्धतीने हा कार्यक्रम हाती घेतलेला आहे . यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख शिवाजीराव माने म्हणाले की मी माझ्या वतीने राज्याचे उपमुख्यमंत्री सन्माननीय एकनाथराव शिंदे साहेब व सर्व मंत्र्याकडे नक्कीच मराठवाड्याला न्याय देण्यासाठी व सदरील अनुशेष भरून काढण्यासाठी विनंती करणार आहे.यासाठी लातूर लोकसभेचे खासदार श्रीमान डॉक्टर शिवाजीराव काळगे साहेब यांनी मराठवाड्यातील सर्व खासदाराशी संपर्क साधून मराठवाडा लेव्हल वरची बैठक आयोजित करावी तसेच सर्व आमदारांना एकत्रित करून मराठवाडा विषयी आवाज उठवण्यासाठी विनंती करावी असे ठरले . आज ३० ऑगस्ट रोजी लातूर येथील ज्येष्ठ विधीज्ञ श्रीमान उदय गवारे यांचा वाढदिवस यावेळी संयोजकाच्या वतीने तसेच शिवसेनेचे जिल्हाप्रमुख शिवाजीराव माने साहेब यांच्या वतीने शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला व वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या.यावेळी नामदेवराव पाटील यांनी मराठवाडा जागरण समितीच्या वतीने आम्ही जागरण यात्रा काढणार असून ही जागरण यात्रा संपूर्ण मराठवाडा वर जाणार आहे. यासाठी आपण सर्वांनी सहकार्य करावे अशी विनंती नामदेव पाटील जिल्हा परिषद माजी सदस्य यांनी केली.

## तळीखेड येथील वृक्षमित्र टीमच्या वतीने १५० झाडांचा पाचवा वाढदिवस उत्साहात साजरा

निलंगा – तळीखेड तालुका निलंगा येथील वृक्षमित्र टीमच्या वतीने व वृक्षावर प्रेम करणाऱ्यां वृक्ष मित्राच्या उपस्थितीत सोमेश्वर मंदिराच्या परिसरात गेल्या पाच वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या वृक्षमित्र टीमच्या वतीने पाच वर्षांपूर्वी लावलेल्या शेकडो झाडांचे संरक्षण करून ते नावारूपाला आलेल्या वृक्षांचे संपूर्ण टीमच्या वतीने त्यातील सुमारे १५० झाडांचा पाचवा वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी गावातील अनेक वृक्षप्रेमी यांच्या उपस्थितीत वृक्षांचा वाढदिवसाचा कार्यक्रम संपन्न झाला.

या अभिनव उपक्रमाचे संपूर्ण परिसरातून वृक्षमित्र संघटनेच्या टीमचे जाहीर अभिनंदन करण्यात येत आहे.

तळीखेड येथील सोमेश्वर मंदिराच्या भव्य परिसरात या टीमच्या वतीने अनेक वृक्षांचे संगोपन करून हा परिसर अतिशय सुंदर तयार केला असून आज घडीला या वृक्षाखाली जिल्हा परिषद शाळेतील शालेय विद्यार्थी व बाळ गोपाळ खेळत असून त्या विद्यार्थ्यांनाही वृक्षांची गोडी लागावी म्हणून जिल्हा परिषद प्रशाला तळखेड येथील सर्व शिक्षक वृंद व विद्यार्थ्यांच्या वतीने वृक्षाचे संगोपन कसे करायचे यांचे धडे येथील शिक्षक बांधव तसेच वृक्षमित्र टीमच्या वतीने सतत मार्गदर्शन करण्यात येत असते.

म्हणून या संपूर्ण वृक्षमित्र टीमचे येथील आजी–माजी सरपंचाच्यावतीने व चेअरमन च्या वतीने वृक्ष मित्र टीमचे अभिनंदन करण्यात येत आहे.

या अभिनव उपक्रम साजरा करण्यासाठी वृक्षमित्र टीमचे. अँड अमर हत्ते,अँड प्रशांत पाटील, अशोक वहरने, गुंडाप्पा राघो, दिलीप कदिरे, ज्योतीराम हजारे, सुनील पाटील, विनोद घोटाळे, रोहित पाटील, शैलेश हत्ते, कमलेश वारद, तानाजी पतंगे, पंढरी भालके, खंडू शेरीकर इत्यादी सह अनेक वृक्ष मित्रांनी या कार्यक्रमासाठी परिश्रम घेतले.



### छत्तीसगड राष्ट्रीय संगीत महोत्सवात होणार बोरगावकर पिता - पुत्रांचे कलाप्रदर्शन

**लातूर/प्रतिनिधी :** येथील लातूर नगरीचे सुपुत्र ज्येष्ठ तबलावादक तालमणी डॉ. राम बोरगावकर आणि युवा पार्श्वगायक मंगेश बोरगावकर यांचे कलाप्रदर्शन छत्तीसगड रजत महोत्सवानिमित्त छत्तीसगड सांस्कृतिक विभाग व केंद्र शासनाच्या वतीने आयोजित महाराजा चक्रधर राष्ट्रीय संगीत समारोह एक सप्ताह चालणार आहे. याप्रसंगी दिनांक ४ सप्टेंबर २०२५ रोजी छत्तीसगडवासीयांना लातूरचे ज्येष्ठ तबलावादक तालमणी डॉ. राम बोरगावकर यांचे तबला सोलोवादन आणि युवा सिने पार्श्वगायक मंगेश बोरगावकर यांचे सुश्राव्य गायन या पिता – पुत्रांचा कलाविष्कार अनुभवायला मिळणार आहे. लातूरकरांसाठी ही निश्चितच अभिमानाची गोष्ट आहे.

या कार्यक्रमाप्रसंगी लेखक कवी कुमार विश्वास,पद्मश्री कैलास खेर, कथ्थक नृत्यांगना पद्मश्री नलिनी कमलिनी,पं. राजेंद्र गंगानी,पं. योगेश सामसी,अंजली शर्मा कथ्थक, पद्मश्री राधेश्याम यांचेसह देशभरातील अनेक सुविख्यात कलावंत सहभागी होणार आहेत. या कार्यक्रमासाठी लातूर येथील सर्व स्तरातील रसिक श्रोत्यांकडून व मान्यवरांकडून बोरगावकर पिता पुत्रांना शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

### टी.सी.हरवली आहे

योगेश अंकुश जाधव रा. लातूर या नावाची लॉर्ड श्रीकृष्ण इंग्लीश स्कूल लातूर येथून मिळालेली सहावी पासची टी.सी. दि. १/७/२०२५ रोजी लातूर ते अहमदपूर बस प्रवासात हरवल आहे. जर कोणास मिळाल्यास ते आणून देणाऱ्यास योग्य ते बक्षीस दिले जाईल.

योगेश अंकुश जाधव
द्वारा : अंकुश लक्ष्मण जाधव
रा. नाथ नगर, लातूर, मो. ९५४५६८६०९५

### CHANGE OF NAME
Declaration

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : SHAIKH AFREEN SHAIKH YOSUF. TO:- AFREEN IRFAN SHAIKH. Hence for this Declaration i will be known by this name and will use . in future the AFREEN IRFAN SHAIKH. will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME :- SHAIKH AFREEN SHAIKH YOSUF
NEW NAME:- AFREEN IRFAN SHAIKH.
Address :- SHIVAJI NAGAR, NILANGA, TA. NILANGA, DIST. LATUR._413521
Adhar no.-585759633479
Mob. No.-9604865488

## भाजप लातूर शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांच्या वाढदिवसानिमित्त विविध उपक्रम

**लातूर/प्रतिनिधी :** भाजप शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांच्या वाढदिवसानिमित्त शहर अंतर्गत असलेले आठ मंडलांच्या वतीने विविध सामाजिक, धार्मिक व शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या विविध कार्यक्रमांना भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

भाजपा शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांचा आज वाढदिवस आहे. या वाढदिवसानिमित्त भाजप शहर अंतर्गत असलेले श्री सिद्धेश्वर मंडल, डॉ बाबासाहेब आंबेडकर मंडल, महात्मा बसवेश्वर मंडल, छत्रपती शिवाजी महाराज मंडल, महर्षी स्वामी दयानंद सरस्वती मंडल, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर मंडल, छत्रपती संभाजीराजे मंडल, छत्रपती शाहू महाराज मंडल यांच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे. यामध्ये सकाळी ८ वाजता ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर रत्नेश्वर मंदिर येथे अभिषेक, ९ वाजता शहरातील सर्व धर्मियांचे श्रद्धास्थान असलेल्या सुरत शाहवली दर्ग्यास चादर अर्पण, सकाळी १० वाजता गंजगोलाई येथील जगदंबा देवीची महाआरती तसेच कव्हा येथील शेखमिया साहेब दर्ग्यास चादर अर्पण करण्यात येणार आहे. शहरातील विविध शाळांमध्ये विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप होणार आहे. गौशाळा येथे चारा वाटप तर शासकीय रुग्णालय येथे फळे वाटप करण्यात येणार आहे. शहराच्या विविध भागांमध्ये वृक्षारोपण तर सायंकाळी गंजगोलाई परिसरात छोट्या विक्रेत्यांसाठी छत्री वाटप करण्यात येणार आहे. मातोश्री वृद्धाश्रम येथे अन्नदान करण्यात येणार आहे. या सोबतच शहराच्या विविध भागांमध्ये वेगवेगळ्या उपक्रमांचे व कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे. या कार्यक्रमांना शहरातील भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन मंडल अध्यक्ष सुरेश जाधव, निर्मला कांबळे, राहुल भुतडा, रोहित पाटील, विशाल हावा पाटील, काकासाहेब चौगुले, सचिन सुरवसे, गोपाळ वांगे यांनी केले आहे.

## MH24-CC मालिकेअंतर्गत आकर्षक वाहन क्रमांक राखीव करण्यासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** परिवहनेत्तर (मोटरसायकल) संवर्गातील वाहनांसाठी MH24-CC ही नवीन मालिका सुरू करण्यात येत आहे. या मालिकेअंतर्गत आकर्षक आणि पसंतीचे वाहन क्रमांक राखीव करण्यासाठी अर्ज स्वीकारण्याची प्रक्रिया उपप्रादेशिक परिवहन कार्यालयात राबविली जाणार आहे.

दिनांक ०२ सप्टेंबर २०२५ रोजी मोटार कार आणि मालवाहू वाहनांसाठी (दुचाकी वगळून), तर दिनांक ०३ सप्टेंबर २०२५ रोजी दुचाकी वाहनांसाठी सकाळी १०:३० ते दुपारी २:३० या वेळेत अर्ज आणि विहित शुल्कासह राष्ट्रीयकृत बँकेचा धनादेश (डीडी) स्वीकारला जाईल.एखाद्या विशिष्ट क्रमांकासाठी एकापेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्यास, त्या क्रमांकाचा लिलाव दिनांक ०३ सप्टेंबर २०२५ रोजी सायंकाळी ४:०० वाजता उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्या कक्षात आयोजित केला जाईल.

लिलावात सहभागी अर्जदाराने वाढीव रक्कमेचा धनादेश (डीडी) सादर करणे बंधनकारक असेल. ज्या अर्जदाराने सर्वाधिक वाढीव रक्कमेचा धनादेश सादर केला, त्याला संबंधित आकर्षक पसंतीचा क्रमांक राखीव ठेवला जाईल. सर्व इच्छुकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन उपप्रादेशिक परिवहन कार्यालयातर्फे करण्यात आले आहे.

### गौरी श्री आगमन्

स्वागत गौरीगणपती
सुखे आनंदले चित्त
संम्मेलन सोहळ्यास
मिळे आयते निमित्त

माहेरवाशीण आल्या
करा प्रेमाने आतिथ्य
भक्ती भावाची देवता
सद्विचार करी सारथ्य

सण संस्कृती सुदर्शन
सर्वां शिकवी आगत्य
शास्त्राच्या धाटणीवर
धर्माचे सार्थ स्थापत्य

ये स्वर्णपाऊले लक्ष्मी
कु शक्ती हो पारिपत्य
स्वागत धुमधडाक्यात
ना घडो दुर्गुण अपथ्य

एकत्र बांधे समाजांस
सणांचेआगळे हे तथ्य
वारसा पुढील पिढीला
देताना जाणीवेचे पथ्य

अंतर्मनातून भक्तीभाव
तदा समारोहां औचित्य
यथा शक्ती यथा समयी
पूजा पाठ स्तवने नित्य

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.

## अजित नेतृत्व..



अजित जसे नाव तसंच काम. अर्थात प्रत्येक कार्यात नैपुण्यच! लातुरच्या राजकारणातील एक तळीळेपरी अर्थात दूरदृष्टी असलेले तरुण तडफदार नेतृत्व. लातुर शहर हे बऱ्याच वर्षांपासून एका तरुण कार्यक्षम नेत्याच्या शोधातच होते. ती अपेक्षा आता अजित पाटील कव्हेकर यांच्या रूपाने पूर्णत्वास आली आहे.

लातूरच्या राजकारणाची चर्चा ही सतत राज्यभरात चालूच असते.दोन महिन्यांपूर्वीही राज्यभरात विशेषत: भाजपा च्या गोटात चर्चा रंगली ती भाजपाच्या महाराष्ट्रातील सर्वात तरुण जिल्हाध्यक्षाची. अर्थातच 'अजित पाटील कव्हेकर यांची.' विधानसभेच्या उमेदवारीचे हक्कदार असताना त्याना डावलले गेले मात्र त्यांनी पक्षाचे व समाजसेवेचे कार्य थांबवले नाही.ह्याचेच फलित की खुद्द 'देवेंद्र फडणविसांनी' अर्थात देवाभाऊनी कव्हेकरांच्या गळ्यात जिल्हाध्यक्ष पदाची माळ घातली अशी चर्चा सर्वत्र झाली. सामाजिक क्षेत्रातही त्यांचे कार्य उल्लेखनीय आहे.संस्थेत शिकणाऱ्या शेकडो गरीब कुटुंबातील विद्यार्थ्यांची फी त्यांनी माफ केली आहे.शहरातील वयोवृद्धांना स्वखर्चाने माता पिता यात्रे मार्फत पंढरपूर दर्शन घडवणे असेल,शेकडो लहान बालकांना देशसेवेचे चित्रपट दाखवण्यासाठी घेऊन जाणे असेल,कोरोन काळात केलेली सेवा असेल किंवा तरुणांचे प्रेरणास्थान छत्रपती शिवाजी महाराजांच्या गड किल्ल्यांची सहल असेल! अशा एक ना अनेक गोष्टी सांगता येतील.लातूरकरांच्या प्रत्येक सुख दुःखात त्यांचा सहभाग असतो. अडचणीच असलेल्या लोकांच्या घरोघरी जाऊन त्यांची विचारपूस करणे व शक्य ती मदत करणे हे त्यांचे रोजचेच कार्य आहे. चहाच्या टपरी पासून ते मोठ्या मोठ्या इंडस्ट्री पर्यंत सर्वच नव–उद्योजकना अजित पाटील कव्हेकर हे प्रेरणा देतात. एका दिवसात ३०–४० विवाहसोहळ्यात उपस्थित राहून शुभेच्छा देणे एवढी प्रचंड ऊर्जा त्यांच्यात आहे.त्यामुळेच अजित कव्हेकर हे लातूरकरांमध्ये राहणारे लातूरकरांचे नेते आहेत.विदेशातील नामांकित विद्यापीठांमधून त्यांनी उच्चशिक्षण घेतले आहे.एवढे असूनही मात्र लातूरसारख्या दुर्गम भागासोबत त्यांनी कधीच नाळ तुटू दिली नाही.लातूरसारख्या शहराचा चेहरा मोहरा बदलण्याचे सामर्थ्य त्यांच्यात आहे.

आपल्या प्रभागात वृक्षलागवड , घनकचरा व्यवस्थापन असे अभिनव प्रयोग राबवून त्यांनी एक आदर्श निर्माण केला आहे.लातूरच्या सर्वांगीण विकासावर भर टाकणाऱ्या अश्या अनेक संकल्पना त्यांच्या विचाराधीन आहेत त्यावर ते निस्वार्थ पणे कार्य करीत आहेत.आज भाजप ची शहरजिल्ह्याची सर्व जबाबदारी त्यांच्या हातात आहे. कारण त्यांच्यावर 'देवाभाऊंचा' हात आहे असे म्हंटले तरी वावगे ठरणार नाही. भाषणाची स्वच्छ शैली, जनमानसांत असलेली विकासशील प्रतिमा, सतत काहीतरी नवीन करायची अजित पाटलांची तळमळ व स्वभावातील विनम्रता या गोष्टींमुळे त्यांनी लहानांपासून ते थोरांपर्यंत सर्वच लातूरकरांच्या मनात घर केले आहे. लोकसेवा हाच त्यांचा पिंड. अशा तेजोमय नेतृवास वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा !

**–केदार दिवाकर कुलकर्णी**
**लातूर**


टोनर रिफिलिंग
फक्त ₹ ३००/-
मास्टरप्लेट ड्रेसिंग क्वालिटी
संपर्क
8600025070
9028376965
प्रिंटर्स पॅराडाईस
प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग

निलंगा शहरातील एलआयसी विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स, जनता दवाखान्यासमोर शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क Off: (02384) 242224, 9422612239, 9422658396


Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी–५२/२४–२६